## विश्रांतीनंतर पाऊस १३ ऑगस्टपासून पुन्हा होणार सक्रिय



**मुंबई :** राज्यात गेल्या काही दिवसांपासून विश्रांती घेतलेल्या पावसाची तीव्रता पुन्हा वाढण्याची शक्यता आहे. सध्या महाराष्ट्रातील सर्वच भागांत मुसळधार पाऊस नसला तरी हवामानात बदल होण्याचे संकेत मिळत आहेत. विशेषतः १३ ऑगस्टपासून राज्यातील काही भागांमध्ये पावसाचा जोर वाढू शकतो. हवामान विभागाने याबाबत महत्त्वाचा अंदाज वर्तवला आहे. येत्या २४ तासांत बंगालच्या उपसागरात कमी दाबाचे क्षेत्र निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे महाराष्ट्रात पावसाला पोषक स्थिती निर्माण होऊ शकते. गेल्या काही दिवसांपासून पावसाचा जोर काहीसा कमी झाला असला तरी मान्सून पुन्हा सक्रिय होण्याची चिन्हे दिसत आहेत. हवामान विभागाच्या अंदाजानुसार १३ ऑगस्टपासून कोकण, घाटमाथा आणि मध्य महाराष्ट्रातील काही भागांमध्ये पावसाची तीव्रता वाढण्याची शक्यता आहे.


रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १९ ◆ अंक २४
www.ramprahar.com

◆ सोमवार, १० ऑगस्ट २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२


अंतरंग


हर घर तिरंगाचा पनवेल पालिकेत उत्साह/३

गव्हाण विद्यालयात क्रांतिकारकांना अभिवादन/६

वर्ल्ड अंडर-२० ॲथलेटिक्समध्ये भारताचा डंका/८


**शेतकऱ्यांसाठी खूशखबर!**

# कर्जमाफीनंतर तीन दिवसांत पीककर्ज!

## ■ कृषिमंत्री दत्तात्रय भरणेंची मोठी घोषणा

**मुंबई : प्रतिनिधी**

शेतकरी कर्जमाफी आणि पीक कर्जाच्या मुद्द्यावर कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी महत्त्वाची माहिती दिली आहे. कर्जमाफीची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर शेतकऱ्यांना पीक कर्ज मिळण्यात कोणतीही अडचण येणार नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. कर्जमाफीनंतर दुसऱ्याच दिवशी नील दाखला मिळेल आणि त्यानंतर तिसऱ्या दिवशी शेतकऱ्यांना पीककर्ज वाटप केले जाईल, असा दावा त्यांनी केला आहे.



त्यामुळे शेतकऱ्यांनी कोणतेही गैरसमज किंवा चिंता बाळगू नये, असे आवाहन त्यांनी केले. दत्तात्रय भरणे यांनी सांगितले की, कर्जमाफीबाबत सरकारकडून योग्य ती प्रक्रिया राबवली जात आहे. नील दाखला मिळाल्यानंतर पीक कर्जासाठी अडथळे राहणार नाहीत. त्यामुळे शेतकऱ्यांनी अफवा किंवा संभ्रमावर विश्वास ठेवू नये. शेतकऱ्यांना वेळेत कर्ज उपलब्ध करून देण्यासाठी सरकार प्रयत्नशील असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

कर्जमाफीच्या मर्यादेबाबत बोलताना भरणे यांनी सांगितले की, दोन लाख रुपयांपेक्षा जास्त असलेली रक्कम शेतकऱ्यांना भरावी लागणार आहे. ही रक्कम कर्ज म्हणून न पाहता थकबाकी म्हणून समजावी. संबंधित शेतकऱ्यांनी ही अतिरिक्त रक्कम भरल्यानंतर कर्जमाफीच्या प्रक्रियेत पुढील लाभ मिळतील. शेतकऱ्यांच्या कर्जमाफीतील रकमेबाबत कोणतीही चिंता करण्याची गरज नसल्याचे कृषिमंत्र्यांनी सांगितले.

१९ रुपयांची रक्कमसुद्धा कर्जमाफीच्या प्रक्रियेत समाविष्ट करण्यात आली असून तीदेखील जमा केली जाईल. शेतकऱ्यांचे हित लक्षात घेऊन निर्णय घेतले जात असल्याचे सांगत त्यांनी शेतकऱ्यांना संयम ठेवण्याचे आवाहन केले आहे.

# खारघर परिसरात जागतिक आदिवासी दिन उत्साहात



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

९ ऑगस्ट ह्या जागतिक आदिवासी दिवसाचे औचित्य साधत खारघरमधील आदिवासी बांधवांनी मोठ्या उत्साहात आणि एकजुटीने जागतिक आदिवासी दिन साजरा केला. आदिवासी एकता संघ, खारघर यांच्या वतीने आदिवासी एकता पदयात्रेचे आयोजन करण्यात आले होते. खारघर परिसरातील बेलपाडा वाडी, फणसवाडी, चाफेवाडी तसेच विविध आदिवासी वाड्यांतील महिला, युवक, ज्येष्ठ नागरिक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने या पदयात्रेत सहभागी झाले होते.



पारंपरिक वेशभूषा, आदिवासी संस्कृतीचे दर्शन घडवणारे फलक आणि एकतेचा संदेश देणाऱ्या घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. आपल्या संस्कृतीचा वारसा जपत समाजातील ऐक्य आणि बंधुभाव अधिक दृढ करण्याचा संदेश या पदयात्रेतून देण्यात आला. दरम्यान, खारघर येथील उत्सव चौकात झालेल्या समारोप कार्यक्रमाला पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी भेट देत आदिवासी समाजाला जागतिक आदिवासी दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

दरम्यान, आदिवासी समाजाचे सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक योगदान महत्त्वपूर्ण असल्याचे त्यांनी यावेळी नमूद केले. या कार्यक्रमाला भारतीय जनता पार्टीचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, खारघर शहराध्यक्ष प्रवीण पाटील, ब्रिजेश पटेल, नगरसेवक नरेश ठाकूर यांच्यासह भाजप पदाधिकारी, स्थानिक नागरिक आणि आदिवासी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. खारघरमध्ये उत्साहपूर्ण वातावरणात पार पडलेल्या या कार्यक्रमाने आदिवासी समाजाची एकता, संस्कृती आणि परंपरांचे जतन करण्याचा संदेश सर्वांपर्यंत पोहोचवला.

# चवदार तळे सत्याग्रहावर कामोठ्यात विशेष कार्यक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाड येथील चवदार तळे सत्याग्रह हा भारतीय सामाजिक परिवर्तनाच्या इतिहासातील एक क्रांतिकारक अध्याय मानला जातो. हा लढा केवळ पाण्याच्या हक्कासाठी नव्हता, तर मानवी स्वाभिमान, समानता आणि सामाजिक न्यायासाठी उभारलेली ऐतिहासिक चळवळ होती. या ऐतिहासिक सत्याग्रहाच्या शताब्दी वर्षानिमित्त कामोठे येथील नालंदा बुद्धविहारात विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. भीमशक्ती रहिवासी सेवा संघ, कामोठे आणि विवेक विचार मंच संलग्न संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी (दि. ९) हा कार्यक्रम संपन्न झाला.



कार्यक्रमात चवदार तळे सत्याग्रहाचा इतिहास, त्यामागील सामाजिक आणि वैचारिक भूमिका यावर मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर उपस्थित होते, तर प्रमुख वक्ते म्हणून मुंबई विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर इंटरनॅशनल रिसर्च सेंटरचे संचालक डॉ. वाल्मीक सरवदे यांनी उपस्थितांना संबोधित केले. डॉ. वाल्मीक सरवदे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सामाजिक समतेसाठी दिलेल्या संघर्षाचे महत्त्व अधोरेखित केले.

चवदार तळे सत्याग्रहाने भारतीय समाजात समानतेची नवी दिशा दिली असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी भीमशक्ती रहिवासी सेवा संघाचे अध्यक्ष मयुर मोहिते, सुभाष कांबळे यांच्यासह अनेक मान्यवर आणि नागरिक उपस्थित होते.

## बारामतीत पुन्हा विमान दुर्घटना

### सुदैवाने प्रशिक्षणार्थी बचावले

**बारामती : प्रतिनिधी**

पुणे जिल्ह्यातील बारामतीमध्ये पुन्हा एकदा एका शिकाऊ विमानाचा अपघात झाल्याची माहिती समोर आली आहे. हे विमान बारामतीच्या एअर फील्डवर प्रशिक्षण सत्रादरम्यान धावपट्टीवरून वळण घेत असताना घसरल्याची प्राथमिक माहिती समोर येत आहे. प्रशिक्षणाच्या सरावादरम्यान ही घटना घडली.

विमानाला काही तांत्रिक अडचणी निर्माण झाल्यानंतर हे विमान धावपट्टीवरून घसरल्याचे सांगितले जाते. अपघातावेळी विमानात दोघे जण होते, मात्र यात कोणालाही दुखापत झाली नसल्याची प्राथमिक माहिती आहे.

अपघात झाल्याचे समजताच विमानतळ प्रशासनाचे अधिकारी, स्थानिक प्रशासनाचे अधिकारी, पोलीस व आपत्कालीन यंत्रणांचे अधिकारी घटनास्थळी पोहचले.

## निवडक

### भारत-पाक सीमेवर घुसखोरीचा प्रयत्न; गोळीबारात संशयित ठार

**पंजाब :** भारत-पाक आंतरराष्ट्रीय सीमेवर घुसखोरीचा प्रयत्न सीमा सुरक्षा दलाने उधळून लावला. पंजाबमधील अमृतसर जिल्ह्यातील दाओके गावाजवळ ही घटना घडली. भारताच्या हद्दीत प्रवेशाचा प्रयत्न करणाऱ्या एका संशयिताला बीएसएफच्या जवानांनी गोळीबार करून ठार केले.

### राज्यपालांचा जेन झी आणि जेन अल्फाशी संवाद

**मुंबई :** राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांनी 'आयआयएमयूएन'च्या व्यासपीठावरून जेन झी व जेन अल्फा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या तरुण पिढीशी संवाद साधला. परिषदेत देशाच्या १०० शहरांतील व पाच इतर देशांतील २००० तरुण सहभागी झाले. राज्यपालांनी भगवद्गीतेचे सार सांगत तरुणांना जिज्ञासा वृत्ती जपण्याचे आवाहन केले.

# आसामला पुराचा तडाखा!

## मृतांचा आकडा ९९वर; दीड लाख लोक बेघर



**आसाम : वृत्तसंस्था**

आसाममधील पुराची स्थिती अजूनही अत्यंत गंभीर बनलेली आहे. राज्यात यावर्षी पुरामुळे जीव गमावणाऱ्यांची संख्या ९९वर पोहोचली असून एक लाख ४७ हजारांहून अधिक नागरिकांना पुराचा फटका बसला आहे. अनेक भागांत घरे आणि रस्ते पाण्याखाली गेल्यामुळे मोठ्या संख्येने लोकांना घरे सोडून मदत छावण्यांमध्ये निवारा घ्यावा लागत आहे.

आसाम आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने जारी केलेल्या माहितीनुसार गोलाघाट जिल्ह्यात आणखी एका व्यक्तीचा मृत्यू झाला असून त्यामुळे या वर्षी पुरामुळे जीव गमावलेल्यांची एकूण संख्या ९९वर पोहोचली आहे. सध्या राज्यातील १२ जिल्हे अजूनही पुराच्या प्रभावाखाली आहेत. यामध्ये सोनितपूर, नागाव, गोलाघाट, शिवसागर, होजाई, दरांग, जोरहाट, धेमाजी, चराईदेव, कार्बी आंगलोंग, लखीमपूर आणि विश्वनाथ या जिल्ह्यांचा समावेश आहे.

# कामोठ्यात राज्यस्तरीय कराटे स्पर्धा | विद्यार्थ्यांनी दाखवले कौशल्य

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कामोठे येथे लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवानिमित्त इंडियन मार्शल आर्ट शितोरियो फेडरेशनच्या वतीने मोफत राज्यस्तरीय कराटे स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलच्या प्रांगणात पार पडलेल्या या स्पर्धेत महाराष्ट्राच्या विविध भागांतून तब्बल ७५०हून अधिक विद्यार्थ्यांनी यावेळी आपला उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

लहान वयातील खेळाडूंनी आपल्या उत्कृष्ट कराटे कौशल्याचे, आत्मविश्वासाचे आणि जिद्दीचे दर्शन घडवत उपस्थितांची मने जिंकली. या स्पर्धेला प्रमुख पाहुणे म्हणून आमदार प्रशांत ठाकूर आणि कामोठेचे नगरसेवक विकास घरत उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देत त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी मार्गदर्शन करताना खेळ हा केवळ विजयासाठी नसून शिस्त, आत्मविश्वास, संयम आणि जिद्द शिकवणारे प्रभावी माध्यम असल्याचे सांगण्यात आले. मेहनत, सातत्य आणि सकारात्मक दृष्टिकोनाच्या जोरावर प्रत्येक सहभागी विद्यार्थी भविष्यात मोठे यश मिळवू शकतो, असा प्रेरणादायी संदेशदेखील यावेळी देण्यात आला.



प्रवीण पाटील आणि सुनील पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली स्पर्धेचे यशस्वी नियोजन करण्यात आले. तसेच पंच राजू कोळी, जितेंद्र गायकर, स्वप्निल भोईर, गोरक्षनाथ पाटील, सत्येंद्र कुमार आणि सहदेव आहुजा यांच्या सहकार्यामुळे स्पर्धा शिस्तबद्ध वातावरणात पार पडली. कराटेसारख्या खेळांमुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मसंरक्षण, धैर्य, एकाग्रता आणि आत्मविश्वास विकसित होतो. अशा स्पर्धा युवा खेळाडूंना आपले कौशल्य सिद्ध करण्यासाठी प्रभावी व्यासपीठ उपलब्ध करून देतात.

# चारधाम यात्रेच्या सुरक्षेसाठी 'नभ नेत्र' ड्रोन

## पाच किमी परिसरातील भाविकांवर ठेवणार नजर

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

चारधाम यात्रा अधिक सुरक्षित आणि व्यवस्थित करण्यासाठी यंदा प्रथमच अत्याधुनिक 'नभ नेत्र' ड्रोन तैनात करण्यात येणार आहे. सुमारे दीड कोटी रुपये किमतीचा हा ड्रोन पाच किलोमीटरच्या परिसरात उड्डाण करून उच्च क्षमतेच्या कॅमेऱ्यांच्या मदतीने भाविकांच्या हालचालींवर नजर ठेवणार आहे. आगामी कावड मेळ्यापासून या ड्रोनचा वापर सुरू करण्यात येणार असून गर्दी नियंत्रण आणि सुरक्षेसाठी त्याचा उपयोग केला जाणार आहे.

चारधाम यात्रेदरम्यान दररोज गर्दीच्या प्रमुख वेळेत 'नभ नेत्र' ड्रोन भाविकांच्या हालचालींची थेट छायाचित्रे आणि चित्रफिती एसडीआरएफ मुख्यालय तसेच चारधाम यात्रा नियंत्रण कक्षाला पाठवणार आहे. त्यामुळे नियंत्रण कक्षातील अधिकारी गर्दीच्या परिस्थितीवर सतत लक्ष ठेवू शकतील. गरज भासल्यास त्यांना तातडीने आवश्यक सूचना देता येणार आहेत.






आपत्ती किंवा आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाल्यास ड्रोन घटनास्थळाची थेट आणि प्रत्यक्ष दृश्ये उपलब्ध करून देईल. त्यामुळे बचाव पथकांना परिस्थितीचा अचूक अंदाज घेऊन मदत आणि बचावकार्याची योग्य दिशा ठरवणे शक्य होणार आहे.

एसडीआरएफचे कमांडंट अर्पण यादवांशी यांनी सांगितले की, अत्याधुनिक 'नभ नेत्र' ड्रोनचे संचालन आगामी कावड मेळ्यापासून सुरू केले जाईल. गर्दी नियंत्रण, देखरेख, आपत्ती व्यवस्थापन आणि बचावकार्य अधिक प्रभावी करण्यासाठी या ड्रोनचा वापर केला जाणार आहे. दरम्यान, कृत्रिम बुद्धिमत्तेशी जोडण्यात आल्याने या प्रणालीद्वारे तातडीचे इशारेही मिळू शकणार आहेत.

# स्वातंत्र्य दिनाच्या सोहळ्यासाठी लाल किल्ल्यावर कडक बंदोबस्त

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

१५ ऑगस्ट रोजी होणाऱ्या स्वातंत्र्य दिनाच्या सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर दिल्ली पोलिसांनी रविवारी (दि. ९) लाल किल्ल्यावर केलेल्या मनुष्यबळ आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानावरील आधारित सुरक्षा व्यवस्थेची सविस्तर माहिती दिली.



दिल्ली पोलीस उत्तर जिल्ह्याचे पोलीस उपआयुक्त राजा बांठिया यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले की, मनुष्यबळ तैनात करणे आणि तांत्रिक प्रणालीचा वापर करणे, असे सुरक्षेचे नियोजन दोन भागात विभागले गेले आहे. दिल्ली पोलीस वाहतूक विभाग, उत्तर जिल्हा पथके, स्थानिक पोलीस, पीसीआर, विशेष शाखा, स्पेशल सेल आणि सामान्य सुरक्षा कर्मचाऱ्यांसह विविध यंत्रणांचे १५ ते २० हजार सुरक्षा जवान तैनात केले जातील. तसेच निमलष्करी दलाच्या अनेक कंपन्या, कमांडो, राष्ट्रीय सुरक्षा रक्षकच्या 'हिट टीम्स' आणि स्नायपर्स लाल किल्ल्यावर तैनात असतील.

कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीला तोंड देण्यासाठी राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाचे पथक उपस्थित असेल. याशिवाय वॉचटॉवर आणि महत्त्वाच्या ठिकाणी त्वरित प्रतिसाद देणारी पथके सज्ज ठेवण्यात आली आहेत.

### हजारांहून अधिक सीसीटीव्हींची नजर

लाल किल्ला आणि लगतच्या परिसरात हजारांपेक्षा जास्त सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आले आहेत. कॅमेऱ्यांच्या फुटेजवर बारीक लक्ष ठेवण्यासाठी प्रशिक्षित कर्मचाऱ्यांसह विशेष नियंत्रण कक्ष उभारण्यात आले आहेत. सुरक्षा अधिक मजबूत करण्यासाठी चेहरा ओळखणारी प्रणाली, गाड्यांच्या नंबर प्लेट ओळखणारे तंत्रज्ञान आणि घुसखोरी शोधणाऱ्या व्हिडिओ ॲनालिटिक्सचा वापर केला जात आहे.

हवेतील संभाव्य धोके रोखण्यासाठी अँटी-ड्रोन सिस्टीम बसवण्यात आल्या आहेत. तसेच काही पोलिसांना बॉडी-वर्न कॅमेरे देण्यात आले आहेत आणि सोशल मीडियावरील हालचालींवरही बारीक लक्ष ठेवले जात आहे. दरम्यान, 'वंदे मातरम' या राष्ट्रीय गीताच्या १५० व्या वर्षाच्या निमित्ताने स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून रविवारी संध्याकाळी दिल्लीतील 'नॅशनल वॉर मेमोरिअल' येथील परम योद्धा स्थळावर भारतीय हवाई दलाच्या बँडचे विशेष सादरीकरण आयोजित करण्यात आले.

## कोपरखैरणे रेल्वेस्थानकावर तरुणीचा छळ

### व्हायरल व्हिडीओनंतर आरोपी ताब्यात

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

कोपरखैरणे रेल्वे स्थानकावर महिला प्रवाशांना त्रास देणाऱ्या एका तरुणाचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर वाशी रेल्वे पोलिसांनी तातडीने कारवाई केली. व्हिडीओमध्ये दिसणाऱ्या २३ वर्षीय तरुणाचा पोलिसांनी अवघ्या सहा तासांत शोध घेत त्याला सानपाडा रेल्वे स्थानकातून ताब्यात घेतले आहे.

सुधीर चहांदे असे तरुणाचे नाव असून तो सध्या ठाणे जिल्ह्यातील उल्हासनगर परिसरात राहत असल्याची माहिती पोलिसांनी दिली. तो मूळचा वर्धातील पुलफैल येथील आनंदनगरचा रहिवासी आहे. ८ ऑगस्ट रोजी सोशल मीडियावर याबाबतचा व्हिडीओ व्हायरल झाला होता.

# समृद्ध मराठी चित्रपटांच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या संस्कृतीला जागतिक व्यासपीठ - मंत्री उदय सामंत

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

मराठी चित्रपटांनी महाराष्ट्राच्या सीमा ओलांडून देशभरात आणि जागतिक स्तरावर आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. दिग्दर्शक, निर्माते, कलाकार आणि तंत्रज्ञ यांच्या अथक परिश्रमामुळे मराठी चित्रपट आज जागतिक व्यासपीठावर पोहोचला असून, मराठी भाषा आणि संस्कृतीचा झेंडा देशाच्या राजधानीतही दिमाखाने फडकत आहे, असे गौरवोद्गार मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी आज येथे काढले.




दिल्ली मराठी प्रतिष्ठानतर्फे महाराष्ट्र शासनाच्या सहकार्याने आयोजित 'दिल्ली मराठी चित्रपट महोत्सवा'ला भेट देऊन प्रेक्षकांशी त्यांनी संवाद साधला. या भव्य महोत्सवाचे उद्घाटन शुक्रवारी झाले.

यावेळी महाराष्ट्र सदनच्या निवासी आयुक्त श्वेता सिंघल, महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाचे सहव्यवस्थापकीय संचालक प्रशांत साजणीकर, महाराष्ट्र परिचय केंद्राचे संचालक हेमराज बागुल यांच्यासह 'देऊळ बंद २' चे दिग्दर्शक प्रवीण तरडे, सत्यशोधक चित्रपटाचे दिग्दर्शक निलेश जळमकर यांची विशेष उपस्थिती होती. या दोन्ही दिग्दर्शकांनीही प्रेक्षकांशी संवाद साधला .

दिल्लीत मराठी चित्रपटांना मिळत असलेला उत्स्फूर्त प्रतिसाद पाहून समाधान व्यक्त करताना मंत्री सामंत यांनी महाराष्ट्राची समृद्ध कला, संस्कृती आणि परंपरा दिल्लीकरांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्याची गरज व्यक्त केली. दिल्लीत भव्य स्वरूपात गणेशोत्सवाचे आयोजन करण्यात यावे, अशी सूचना करून ते म्हणाले, या उत्सवाच्या माध्यमातून दिल्लीतील नागरिकांना महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरेचे अधिक व्यापक आणि प्रत्यक्ष दर्शन घडेल, तसेच महाराष्ट्राचा सांस्कृतिक ठसा राजधानीत अधिक ठळकपणे उमटेल. मराठी चित्रपट केवळ मुंबई आणि पुण्यापुरता मर्यादित न ठेवता देशातील विविध भागांपर्यंत पोहोचविण्याची आवश्यकता आहे. विशेषतः तंजावर आणि बडोदा यांसारख्य मराठी संस्कृतीशी ऐतिहासिक नाते असलेल्या शहरांमध्येही मराठी चित्रपट महोत्सव आयोजित करण्यावर भर देण्यात यावा, असे त्यांनी सुचवले.

देशातील प्रत्येक राज्यात मराठी भाषा, मराठी माणूस आणि मराठी संस्कृतीची दखल घेतली जावी, यासाठी चित्रपट महोत्सवांसह विविध सांस्कृतिक उपक्रम देशभर तसेच परदेशात आयोजित करण्याची गरज आहे. मराठी संस्कृतीची व्यापक ओळख निर्माण करण्यासाठी शासनाच्या माध्यमातून आवश्यक ते सहकार्य केले जाईल, अशी ग्वाहीही त्यांनी यावेळी दिली. मराठी भाषेच्या जागतिक प्रसारासाठी शासनाच्या माध्यमातून सुरू असलेल्या प्रयत्नांची माहिती देताना ते म्हणाले, अमेरिकेतील बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या अधिवेशनासाठी आणि मराठी भाषेच्या कार्यासाठी ३० लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आले आहेत. परदेशातील मराठी भाषिकांच्या भाषा, संस्कृती आणि परंपरा जपण्याच्या प्रयत्नांना शासनाकडून पूर्ण पाठबळ देण्यात येत असून प्रत्येक राज्यात मराठी माणसाची ताकद आणि मराठी भाषेचा प्रभाव अधिक दृढ व्हावा, यासाठी शासनस्तरावर सर्वतोपरी प्रयत्न केले जातील.

दरम्यान, या चित्रपट महोत्सवाचा आज दुसरा दिवस होता. यादरम्यान 'तुंबाडची मंजुळा', 'घुबाड कुंड', 'स्थळ' आणि 'फुलवंती' हे दर्जेदार मराठी चित्रपट रसिकांसाठी दाखवण्यात आले. राजधानीतील मराठी बांधवांनी या महोत्सवाला दिलेला उत्स्फूर्त प्रतिसाद आणि मोठ्या संख्येने लावलेली उपस्थिती अत्यंत कौतुकास्पद असून, मराठी चित्रपट, भाषा आणि संस्कृतीला राजधानी दिल्लीच्या सांस्कृतिक पटावर मिळणारे हे स्थान निश्चितच अभिमानास्पद असल्याचे मंत्री सामंत यांनी आवर्जून सांगितले. दिल्ली मराठी प्रतिष्ठानचे विवेक गार्गे यांनी यावेळी मंत्री सामंत यांचा सत्कार केला.

सकाळच्या संत्रात फिल्म टेलिव्हिजन इन्स्टिट्यूट ऑफ इंडियाचे प्रा. मिलिंद दामले यांनी चित्रपट अभ्यासाकांचे विशेष सत्र घेतले.

## नव्या डिझेल दरामुळे मच्छीमारांवर आर्थिक बोजा

**उरण :** सध्या शासनाकडून मासेमारीसाठी सवलतीच्या दराने मिळणारे डिझेल महाग झाले आहे. सरकारने मच्छिमारांना घाऊक डिझेल खरेदीदार ठरविण्यात आले आहे. त्यामुळे किरकोळ बाजारात मिळणाऱ्या ९६ ते ९७ रुपये लीटर ऐवजी घाऊक डिझेल १०८ रुपये दर मोजावे लागत आहेत. त्यामुळे मच्छिमारांना चढ्या दराने डिझेल खरेदी करावे लागत आहे. याचा आर्थिक फटका मच्छिमारांना बसत आहे. त्यामुळे मच्छिमारांमध्ये असंतोष आहे.त्याचप्रमाणे शासनाकडून मच्छिमारांना दिला जाणारा नियमित डिझेल कोटा आणि अनुदान वेळेत मिळत नसल्याच्या तक्रारी आहेत.

बंदी नंतर एकाचवेळी मोठ्या प्रमाणात मासेमारी होत असल्याने मासळीला योग्य दर मिळत नाही. मासेमारी व्यवसाय घाटयात चाललेला असतांना मासेमारीच्या ऐन हंगामात बंदीत वाढ केल्याने मच्छिमारांवर अधिकच संकट येणार असल्याचे मच्छिमारांचे म्हणणे आहे. दोन महिन्या ऐवजी यावर्षी अडीच महिन्याचा बंदी काळ झाल्याने मच्छिमारांवर अधिक आर्थिक संकट कोसळले आहे.

## मिसिंग लिंकवर आता तिसऱ्या डोळ्याची नजर; अवजड वाहनांनी वाहतूक केल्यास कारवाई

**खोपोली : रामप्रहर वृत्त**

मिसिंग लिंक नवीन मार्गामुळे वेळेची मोठी बचत होत असली, तरी अनेक वाहनचालक वेगमर्यादेचे नियम धाब्यावर बसवून वाहने पळवत असल्याचे समोर आले आहे. नुकत्याच गुरुवारी मध्यरात्री वेगाच्या भरात झालेल्या भीषण अपघातात एका चालकाला आपला जीव गमवावा लागला.या घटनेची गंभीर दखल घेत महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ आणि महामार्ग पोलीस प्रशासनाने संयुक्तपणे दुर्घटना स्थळाची पाहणी केली.सुरक्षिततेचा उपाय म्हणून बोगद्यांच्या प्रवेशद्वारांवर तसेच आतल्या भागात तातडीने हाय-स्पीड कॅमेरे कार्यान्वित करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. यामुळे वेगमर्यादा ओलांडणाऱ्या गाड्यांवर थेट डिजिटल पद्धतीने दंडात्मक कारवाई होणार आहे.



मिसिंग लिंग वाहन चालकांसाठी खुल केल्यापासून अवजड वाहने जात आहेत. वाहनांचा स्पीड जास्त असल्याने अपघात मालिका सुरू झाली आहे.मिसिंग लिंकवर सध्यातरी अवजड आणि व्यावसायिक वाहनांच्या वाहतुकीला पूर्णपणे बंदी घालण्यात आली आहे. असे असतानाही अनेक टेम्पो व ट्रकचालक नियम मोडून या मार्गावर प्रवेश करत आहेत. नुकत्याच गुरुवारी मध्यरात्री वेगाच्या भरात झालेल्या भीषण अपघातात एका चालकाला आपला जीव गमवावा लागला. घटनेची प्रशासनाने दुर्घटनास्थळी पाहणी केली.

बोगद्यांमध्ये अत्याधुनिक ओव्हरस्पीड कॅमेरे वाहनांच्या अनियंत्रित वेगामुळे वाढणाऱ्या अपघातांच्या पार्श्वभूमीवर, या मार्गातील चारही बोगद्यांमध्ये अत्याधुनिक ओव्हरस्पीड कॅमेरे बसवण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे.यामुळे वेगमर्यादा ओलांडणाऱ्या गाड्यांवर थेट डिजिटल पद्धतीने दंडात्मक कारवाई होईल तसेच ट्रक,टेम्पो आदि अवजड वाहनांना बंदी असूनही मिसिंग लिंकवरून वाहतूक केल्यास कडक कारवाई केली जाणार आहे.

## चारचाकी वाहनात शिरलेल्या मुंगसाची सुटका

**नवी मुंबई : बातमीदार**

परिसरात एका चारचाकी वाहनात अचानक मुंगूस शिरल्याची घटना घडली. मुंगूस वाहनाच्या आत गेल्याचे लक्षात येताच वाहनमालकासह परिसरातील नागरिकांमध्ये काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.

नागरिकांनी पुनर्वसु फाउंडेशनशी संपर्क साधण्यात आला. त्यानंतर माहिती मिळताच सर्पमित्र अष्टविनायक मोरे यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली.वाहनाची बारकाईने पाहणी केली असता मुंगूस गाडीच्या पुढील चाकाजवळ लपून बसले होते. परिस्थितीची काळजीपूर्वक पाहणी करून कोणताही धोका निर्माण होणार नाही याची खबरदारी घेत सर्पमित्र अष्टविनायक मोरे यांनी मुंगुसाला सुरक्षितपणे बाहेर काढले. मुंगुसाला बाहेर काढल्यानंतर त्याला कोणतीही दुखापत झाली आहे का, याची तपासणी करण्यात आली.

## रोहा तालुका क्रीडा संकुलाचा होणार कायापालट; पाच कोटींचा निधी मंजूर

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील खेळाडूंना दर्जेदार आणि अत्याधुनिक क्रीडा सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने रोहा तालुका क्रीडा संकुलासाठी तब्बल ५ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. या निधीतून सुमारे साडेतीन ते चार कोटी रुपयांची विविध विकासकामे करण्यात येणार असून, खेळाडूंसोबतच रोहेकर नागरिकांनाही याचा मोठा फायदा होणार आहे. क्रीडा संकुलात विविध खेळांसाठी सुविधा उभारण्याबरोबरच खेळाडू आणि नागरिकांसाठी वॉकिंग ट्रॅकही विकसित करण्यात येणार आहे.रोहा तालुका क्रीडा संकुल, धाटाव येथे नूतनीकरण करण्यात आलेल्या बॅडमिंटन कोर्टाचे लोकार्पण शनिवार, दि. ८ ऑगस्ट रोजी महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी त्या बोलत होत्या.



बॅडमिंटन कोर्टाच्या नूतनीकरणाचे काम दर्जेदार पद्धतीने करण्यात आले असून, खेळाडूंना सराव व स्पर्धांसाठी उत्तम सुविधा मिळावी यासाठी नवीन दर्जेदार मॅट बसविण्यात आली आहे. या नूतनीकरणामुळे रोहा तालुक्यातील बॅडमिंटन खेळाडूंना मोठा फायदा होणार आहे.रोहा तालुक्यात क्रिकेट, कबड्डी, खो-खो, बॅडमिंटन, ॲथलेटिक्स यांसह विविध खेळांना मोठा प्रतिसाद आहे. त्यामुळे पहिल्या टप्प्यात तालुक्यात मोठ्या प्रमाणावर खेळल्या जाणाऱ्या पाच ते सहा प्रमुख खेळांसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याचे नियोजन करण्यात आले आहे. मंजूर झालेल्या पाच कोटी रुपयांच्या निधीतून सुमारे साडेतीन ते चार कोटी रुपयांची विविध विकासकामे केली जाणार आहेत. यामध्ये खेळांच्या सुविधा, मैदानांची सुधारणा, आवश्यक दुरुस्ती, वॉटरप्रूफिंग, पायाभूत सुविधा तसेच खेळाडू आणि नागरिकांसाठी चालण्यासाठी ट्रॅक यांचा समावेश आहे.

क्रीडा संकुलात ४०० मीटर धावपट्टीसह विविध आधुनिक सुविधा निर्माण करण्याच्या दृष्टीनेही प्रयत्न सुरू आहेत. भविष्यात या क्रीडा संकुलात राज्यस्तरीय स्पर्धा आयोजित करता याव्यात, यादृष्टीनेही संकुलाचा दर्जा उंचावण्यात येणार आहे.क्रीडा संकुलाच्या विकासामुळे केवळ खेळाडूंनाच नव्हे तर सर्वसामान्य नागरिकांनाही याचा लाभ मिळणार आहे. सकाळ-संध्याकाळ चालणे, व्यायाम करणे यासाठी नागरिकांना सुरक्षित आणि चांगला वॉकिंग ट्रॅक उपलब्ध होणार आहे. त्यामुळे क्रीडा संकुल हे भविष्यात खेळाडूंसोबतच नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीनेही महत्त्वाचे केंद्र ठरणार आहे.

यावेळी जिल्हा परिषद सभापती विजया पाशिलकर, जिल्हा परिषद उपाध्यक्ष मधुकर पाटील, रोहा नगराध्यक्षा वनश्री शेंडगे,प्रांताधिकारी ज्ञानेश्वर खुटवड, राष्ट्रवादीचे तालुका अध्यक्ष विनोद पाशिलकर, जिल्हा परिषद सदस्या निधी जाधव, जिल्हा क्रीडा अधिकारी प्रकाश वाघ, उपसभापती संजय माडलुस्कर, प्रदेश चिटणीस विजय मोरे, गटनेते किसन राव मोरे, डॉ. अशोक जाधव यांच्यासह तालुका क्रीडा संकुल समितीचे पदाधिकारी, अधिकारी, खेळाडू व नागरिक उपस्थित होते.

## 'वनहक्काचे प्रलंबित पट्टे १५ दिवसांत देण्यासाठी पाठपुरावा करणार'

**पाली : प्रतिनिधी**

जागतिक आदिवासी दिन हा केवळ उत्सवापुरता मर्यादित न ठेवता आदिवासी समाजाच्या शिक्षण, रोजगार, हक्क आणि सर्वांगीण विकासाला चालना देण्यासाठी वर्षभर काम झाले पाहिजे. सुधागड तालुक्यात वनहक्क कायद्यांतर्गत पात्र असूनही प्रलंबित असलेल्या लाभार्थ्यांची व आदिवासी वाड्यांची नावासह यादी उपलब्ध करून दिल्यास, त्यांच्या नावावर वनहक्काचे पट्टे मिळवून देण्यासाठी खासदार म्हणून पाठपुरावा करणार असल्याचे राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष तथा खासदार सुनील तटकरे यांनी पाली येथे सांगितले. जागतिक आदिवासी दिनानिमित्त पाली येथे आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी त्यांनी आदिवासी समाजाच्या प्रगतीसाठी शिक्षण, कौशल्यविकास, रोजगार, वनहक्क आणि सांस्कृतिक वारशाच्या जतनावर विशेष भर दिला.



यावेळी राजिप चे उपाध्यक्ष मधुकर पाटील, माजी राजिप सदस्य किशोर जैन, आदिवासी समाज अध्यक्ष चंद्रकांत वाघमारे, उपसभापती संदेश शेवाळे, जिल्हा परिषद सदस्य चंद्रकांत वारगुडा,उपनगराध्यक्ष सुलतान बेनसेकर, नगरसेवक सुधीर भालेराव अशिक मणियार, प्रकाश कारखानीस, माजी सभापती साक्षी दिघे, सुनील राऊत, ग रा म्हात्रे, मयुर कारखानीस तसेच राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यकर्ते महिला तालुका अध्यक्षा व राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी, लोकप्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्त तसेच मोठ्या संख्येने आदिवासी बांधव व महिला उपस्थित होत्या. यावेळी आदिवासी समाजाच्या विविध मागण्यांचे निवेदन तटकरे यांना देण्यात आले. यावेळी आदिवासी बांधवांना वस्तूचे वाटप खासदार सुनील तटकरे यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी बोलतांना खासदार सुनील तटकरे म्हणाले की सुधागड तालुक्यातील आदिवासी समाजाच्या विविध प्रश्नांवर १५ ऑगस्टनंतर जिल्हाधिकारी, प्रांताधिकारी, तहसीलदार, वनविभागाचे अधिकारी, प्रकल्प अधिकारी आणि संबंधित लोकप्रतिनिधींची संयुक्त बैठक पाली येथे घेण्यात येईल, अशी घोषणा तटकरे यांनी केली. या बैठकीत आदिवासी समाजाच्या प्रलंबित प्रश्नांवर ठोस निर्णय घेण्याचा प्रयत्न केला जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

वनहक्क कायद्यांतर्गत पात्र असलेल्या मात्र अद्याप लाभापासून वंचित राहिलेल्या आदिवासी कुटुंबांची माहिती संकलित करण्याची जबाबदारी स्थानिक पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी घ्यावी. लाभार्थ्यांची नावासह यादी मिळाल्यानंतर पुढील कार्यवाहीला गती देण्याचे आश्वासन तटकरे यांनी दिले.

सुधागडमध्ये उभारण्यात येणारे आदिवासी भवन हे केवळ जागतिक आदिवासी दिनाचा कार्यक्रम घेण्यासाठीची वास्तू न राहता, आदिवासी समाजाच्या विकासासाठी वर्षाचे ३६५ दिवस कार्यरत राहिले पाहिजे.

## जागतिक आदिवासी दिनी कोल्हारे वाडीतील महिलांचा दारूबंदीचा एल्गार

**नेरळ : प्रतिनिधी**

कोल्हारे ग्रामपंचायत हद्दीतील कोल्हारे वाडीतील आदिवासी महिलांनी जागतिक आदिवासी दिनाचे औचित्य साधत दारूबंदीचा एल्गार पुकारला आहे. वाडीमध्ये १०० टक्के दारूबंदी लागू करावी, या मागणीसाठी महिलांनी नेरळ पोलिस ठाण्यात धाव घेत पोलिस अधिकारी राहुल वरोटे यांची भेट घेत निवेदन दिले.

कोल्हारे वाडीतील नागरिक हाताच्या बोटावर मोजता येईल एवढ्या कमाईवर मोलमजुरी, रोजंदारी करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. मात्र, दारूच्या व्यसनामुळे कष्टाने कमावलेला पैसा वाया जाण्याबरोबरच कुटुंबांमध्ये भांडण,वाद वाढत आहेत,आर्थिक आणि सामाजिक अडचणी निर्माण होत असल्याची महिलांची भावना आहे. काहींच्या घरात संसार मोडण्याचा घटना देखील समोर आल्यात त्यामुळे वाडीतील दारूविक्रीला पूर्णपणे आळा घालून कोल्हारे वाडी १०० टक्के दारूमुक्त करण्याची मागणी महिलांनी केली आहे.



जागतिक आदिवासी दिनाच्या दिवशी महिलांनी एकत्र येत घेतलेली ही भूमिका लक्षवेधी ठरली आहे. दारूमुळे कुटुंबांची होणारी वाताहत थांबविण्यासाठी आता पोलिस प्रशासनाने कठोर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली.या वेळी सामाजिक कार्यकर्ते विजय हजारे उपस्थित होते.

## तिसले येथे भात पिकाची नैसर्गिक शेतीशाळा उत्साहात

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरुड तालुक्यातील आंबोली ग्रामपंचायत हद्दीतील तिसले येथे सहाय्यक कृषी अधिकारी मनोज कदम यांच्या मार्गदर्शनाखाली भात पीक उत्पादक शेतकऱ्यांसाठी कीड रोग सर्वेक्षण सल्ला व प्रकल्प क्रॉपसॅप अंतर्गत भात पिकाची "नैसर्गिक शेतीशाळा" घेण्यात आली. यावेळी शेतकऱ्यांना नैसर्गिक शेतीचे महत्त्व, भात पिकातील कीड-रोग व्यवस्थापन तसेच पर्यावरणपूरक शेती पद्धतींबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

यावेळी नैसर्गिक शेतीशाळेत तालुका कृषी अधिकारी प्रमोद नरळे,सहाय्यक कृषी अधिकारी मनोज कदम,पराग भोजने,प्रगतशील शेतकरी काशिनाथ पाटील, आदेश भोईर ,हिना शेख यांच्यासह परिसरातील भात उत्पादक शेतकरी उपस्थित होते.पराग भोजने, हिना शेख तसेच तालुका कृषी अधिकारी प्रमोद नरळे यांनी शेतकऱ्यांना भात पिकातील विविध बाबींवर सविस्तर मार्गदर्शन केले. भात पिकामध्ये आढळणाऱ्या विविध किडी व रोगांची लक्षणे, त्यांची ओळख, पिकाचे नियमित निरीक्षण आणि योग्य वेळी करावयाच्या उपाययोजनांबाबत शेतकऱ्यांना माहिती देण्यात आली.



सहाय्यक कृषी अधिकारी मनोज कदम यांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन करतेवेळी म्हणाले की नैसर्गिक शेती ही काळाची गरज आहे. नैसर्गिक शेतीमध्ये स्थानिक पातळीवर उपलब्ध नैसर्गिक संसाधनांचा वापर करून शेतीचा उत्पादन खर्च कमी करणे, जमिनीचे आरोग्य व सुपीकता टिकवणे आणि पर्यावरणाचा समतोल राखणे याला महत्त्व दिले जाते. रासायनिक निविष्ठांचा अनावश्यक वापर कमी करून जमिनीतील जैविक घटकांचे संवर्धन करणे हा नैसर्गिक शेतीचा महत्त्वाचा भाग आहे.शेतकऱ्यांना बीजामृत, जीवामृत, घनजीवामृत, आच्छादन (मल्चिंग), दशपर्णी अर्क, नीमास्त्र आदी नैसर्गिक निविष्ठांचा योग्य पद्धतीने वापर करावा या पद्धतींच्या वापरामुळे जमिनीतील सेंद्रिय कर्ब व सूक्ष्मजीवांची कार्यक्षमता वाढण्यास मदत होते तसेच पिकासाठी पोषक वातावरण निर्माण होते.तसेच भात पिकातील कीड-रोग व्यवस्थापनावर भर दिला पाहिजे भात पिकामध्ये खोडकीड, तुडतुडे, पाने गुंडाळणारी अळी, करपा यांसारख्या किडी व रोगांचा प्रादुर्भाव होऊ शकतो. त्यामुळे शेतकऱ्यांनी पिकाची नियमित पाहणी करून सुरुवातीच्या अवस्थेतच किडी व रोगांची लक्षणे ओळखावीत, असा सल्ला देण्यात आला.

आर्थिक नुकसान पातळीचा विचार करून आवश्यकतेनुसार नियंत्रण उपाययोजना करणे आणि अनावश्यक रासायनिक कीटकनाशकांचा वापर टाळणे यावर विशेष भर द्यावा.नैसर्गिक शेतीमुळे उत्पादन खर्चात बचत, जमिनीचे आरोग्य सुधारणा, जैवविविधतेचे संवर्धन, पर्यावरणाचे संरक्षण आणि शाश्वत शेतीला चालना मिळण्यास मदत होते.

# आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त विविध समाजोपयोगी उपक्रम

## मोफत नेत्रचिकित्सा व सर्वसाधारण आरोग्य तपासणी शिबिर

**पनवेल :** महानगरपालिकेच्या नगरसेविका प्रतिभा भोईर यांच्या पुढाकारातून नवीन पनवेल येथील आद्य क्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके विद्यालयात मोफत नेत्रचिकित्सा व सर्वसाधारण आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले.

जगप्रसिद्ध नेत्रतज्ज्ञ डॉ. सुहास हळदीपूरकर यांच्या लक्ष्मी चॅरिटेबल ट्रस्टच्या तज्ज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या शिबिरामध्ये नागरिकांची मोफत नेत्रतपासणी करण्यात आली. तसेच अत्यल्प दरात मोतीबिंदू



शस्त्रक्रियेची सुविधाही उपलब्ध करून देण्यात आली. यासोबतच मोफत वैद्यकीय आरोग्य तपासणी शिबिराचाही नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर लाभ घेतला.

या शिबिराला आमदार प्रशांत ठाकूर यांनी भेट देऊन उपक्रमाची पाहणी केली. समाजहितासाठी राबविण्यात आलेल्या या उपक्रमाबद्दल त्यांनी नगरसेविका प्रतिभा भोईर यांचे विशेष कौतुक केले. यावेळी भाजपाचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, पनवेल महानगरपालिकेचे महापौर नितीन पाटील, नगरसेवक संतोष शेट्टी, नगरसेवक दशरथ म्हात्रे, नगरसेवक महादेव मधे तसेच इतर मान्यवर उपस्थित होते. नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेणारे असे उपक्रम समाजासाठी अत्यंत उपयुक्त ठरत असून, भविष्यातही अशा सेवाभावी कार्यक्रमांचे आयोजन सुरू राहील असा विश्वास व्यक्त केला.

## खारघरमध्ये नेत्र तपासणी शिबिर

**खारघर :** भाजप खारघरचे सरचिटणीस दीपक शिंदे आणि खारघर शहरमंडळाचे उपाध्यक्ष ज्ञानेश्वर खरपुरीया यांच्या संयुक्त विद्यमाने श्री रामशेट ठाकूर पब्लिक स्कूल येथे मोफत नेत्र तपासणी शिबिर, अत्यल्प दरात मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर, तसेच मोफत आरोग्य आणि हृदयरोग तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या शिबिराला महाराष्ट्र प्रदेश भाजपचे चिटणीस आणि पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी भेट देत उपक्रमाची पाहणी केली. यावेळी जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी,भाजप खारघर मंडळ अध्यक्ष तथा नगरसेवक प्रवीण पाटील, नगरसेवक नरेश ठाकूर, माजी शहराध्यक्ष ब्रिजेश पटेल यांच्यासह अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.



नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेणारे असे उपक्रम समाजासाठी अत्यंत महत्त्वाचे असल्याचे मत आमदार प्रशांत ठाकूर यांनी व्यक्त केले. तसेच या लोकोपयोगी उपक्रमासाठी आयोजकांचे अभिनंदन करत त्यांनी पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## प्रभाग क्रमांक १४चे अध्यक्ष कुणाल पाटील यांच्या वतीने मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन



**पनवेल :** भारतीय जनता पार्टी युवा मोर्चाचे प्रभाग क्रमांक १४ चे अध्यक्ष कुणाल पाटील यांच्या वतीने मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन रविवारी, ९ ऑगस्ट रोजी धाकटा खांदा येथील श्री गणेश विद्यामंदिर येथे करण्यात आले. या आरोग्य शिबिरामध्ये परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला.

नागरिकांची विविध आरोग्य तपासणी करण्यात आली तसेच तज्ज्ञ डॉक्टरांकडून आरोग्यविषयक मार्गदर्शनही देण्यात आले. समाजाच्या आरोग्याची काळजी घेणारा हा उपक्रम नागरिकांसाठी लाभदायी ठरला. या शिबिराला आमदार प्रशांत ठाकूर यांनी सदिच्छा भेट देत आयोजकांचे कौतुक केले. समाजसेवेच्या माध्यमातून नागरिकांपर्यंत पोहोचणारे असे उपक्रम अधिकाधिक राबविण्याची गरज असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. तसेच उपस्थित नागरिकांना उत्तम आरोग्यासाठी शुभेच्छा दिल्या.

यावेळी माजी नगरसेविका सारिका भगत, हेमलता म्हात्रे, गणपत म्हात्रे, भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष मयूरेश नेतकर, हितेश बहीरा, अतुल भगत यांच्यासह भारतीय जनता पार्टी युवा मोर्चाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या या मोफत आरोग्य शिबिराचे नागरिकांनी स्वागत करत आयोजकांचे आभार मानले.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात विद्यार्थ्यांसाठी अमली पदार्थ व व्यसनमुक्ती जनजागृती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात दिनांक ७ ऑगस्ट रोजी सकाळी ११.०० वाजता महाविद्यालयाच्या वतीने विद्यार्थ्यांमध्ये अंमली पदार्थांचे सेवन, व्यसनाधीनता आणि त्याचे दुष्परिणाम याबाबत जनजागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने 'अंमली पदार्थ व ड्रग्ज जनजागृती कार्यक्रम' आयोजित करण्यात आला होता.



आजच्या बदलत्या सामाजिक परिस्थितीत युवा पिढीला अंमली पदार्थांच्या विळख्यातून दूर ठेवणे, त्यांना व्यसनाचे शारीरिक, मानसिक, सामाजिक तसेच कायदेशीर परिणाम समजावून सांगणे आणि निरोगी व जबाबदार जीवनशैलीचा स्वीकार करण्यासाठी प्रेरित करणे हा या कार्यक्रमाचा प्रमुख उद्देश होता.या कार्यक्रमासाठी नवी मुंबई नार्कोटिक्स विभागाच्या पोलीस उपनिरीक्षक उज्ज्वला सोलेसर या प्रमुख वक्त्या म्हणून उपस्थित होत्या. त्यांनी विद्यार्थ्यांना अंमली पदार्थांचे सेवन व व्यसनाधीनतेचे गंभीर परिणाम याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

आपल्या मार्गदर्शनपर भाषणात त्यांनी विविध प्रकारच्या अंमली पदार्थांपासून निर्माण होणारे धोके, व्यसनाची सुरुवात कशी होते, तरुणांवर त्याचा होणारा परिणाम तसेच व्यसनामुळे व्यक्तीच्या आरोग्यावर, शिक्षणावर, कुटुंबावर आणि सामाजिक जीवनावर होणारे गंभीर परिणाम याबाबत विद्यार्थ्यांना माहिती दिली. 'व्यसनापासून दूर राहणे हीच खरी सुरक्षितता' असून विद्यार्थ्यांनी आपल्या भवितव्याचा विचार करून कोणत्याही प्रकारच्या अमली पदार्थांच्या प्रलोभनाला बळी पडू नये, असे आवाहन त्यांनी केले.तसेच अंमली पदार्थांच्या सेवनामुळे निर्माण होणाऱ्या कायदेशीर परिणामांबाबतही त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. अंमली पदार्थांच्या वापरासोबतच त्यांची विक्री, वाहतूक, साठवणूक किंवा वितरण यासंदर्भातील कायदेशीर तरतुदी आणि त्यातून उद्भवणाऱ्या गंभीर परिणामांची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली.विद्यार्थ्यांनी व्यसनमुक्त आणि आरोग्यदायी जीवनशैलीचा स्वीकार करावा, आपल्या मित्र–मैत्रिणींमध्येही व्यसनमुक्तीबाबत जनजागृती करावी आणि समाजात 'ड्रग्जमुक्त युवा सुरक्षित समाज' हा संदेश पोहोचवावा, असे आवाहन या कार्यक्रमातून करण्यात आले.कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून अंमली पदार्थ व व्यसनाधीनतेशी संबंधित विविध प्रश्न उपस्थित केले. प्रमुख वक्त्यांनी विद्यार्थ्यांच्या शंकानिरसन केले. त्यामुळे कार्यक्रम अधिक संवादात्मक आणि माहितीपूर्ण ठरला.या जनजागृती कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांना अंमली पदार्थांचे धोके, व्यसनाधीनतेचे दुष्परिणाम आणि त्यापासून स्वतःचे संरक्षण करण्याच्या उपाययोजनांबाबत महत्त्वपूर्ण माहिती मिळाली.

## गव्हाण विद्यालयात बालचित्रकला स्पर्धेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**उरण : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र शासनाच्या वतीने व महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ,मुंबई यांच्या माध्यमातून आयोजित बालचित्रकला स्पर्धा २०२६ चे आयोजन रयत शिक्षण संस्थेच्या श्रीछत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेज, गव्हाण–कोपर येथे शनिवार, दि. ८ऑगस्ट रोजी उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आले.



विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा, त्यांच्या सर्जनशीलतेला चालना मिळावी आणि चित्रकलेच्या माध्यमातून त्यांच्या कल्पनाशक्तीला व्यासपीठ मिळावे, या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या यास्पर्धेत विद्यालयातील सुमारे १०० विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.ही स्पर्धा इयत्ता पाचवी तेसातवी आणि इयत्ता आठवी ते दहावी अशा दोन गटांत घेण्यात आली. पाचवी ते सातवीच्याविद्यार्थ्यांसाठी 'गावातील आठवडे बाजार', 'किल्ला बनवणारी मुले' आणि 'बसस्थानकावरील एक प्रसंग'असे तीन विषय देण्यात आले होते. तर आठवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी 'वर्ग सजावट करणारी मुले','फुटबॉल खेळणारी मुले' आणि 'विद्यार्थ्यांना प्रयोगशाळेत प्रयोग दाखवणारे शिक्षक' असे विषय देण्यातआले होते. विद्यार्थ्यांनी दिलेल्या तीन विषयांपैकी आपल्या आवडीच्या एका विषयाची निवड करूनकल्पकतेने व कलात्मकतेने चित्रे साकारली.

स्पर्धेदरम्यान विद्यालयाच्या मुख्याध्यापिका ज्योत्स्ना ठाकूर, उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे, पर्यवेक्षिका शशिकला पाटील, लाइफ वर्कर व ज्येष्ठ शिक्षक देवेंद्र म्हात्रे यांनी स्पर्धेची पाहणी केली. त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत त्यांच्या कलाकृतींचे कौतुक करुन त्यांना मार्गदर्शन व प्रोत्साहन दिले. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना योग्य दिशा देत संपूर्ण स्पर्धेचे सुंदर आयोजन विद्यालयाचे कलाशिक्षक गणेश भोईर यांनी केले. त्यांच्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेत आपल्या कल्पनाशक्तीला रंग–रेषांच्या माध्यमातूनसुंदर अभिव्यक्ती दिली.बालचित्रकला स्पर्धेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना व्यासपीठमिळाले असून, त्यांच्या सर्जनशीलतेला आणि आत्मविश्वासाला निश्चितच नवी प्रेरणा मिळाली.विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे विद्यालयाचा परिसर दिवसभर रंग, कल्पना आणि सर्जनशीलतेने फुलून गेला होता.

## पनवेलमध्ये जागतिक आदिवासी दिन जल्लोषात

**पनवेल:** जागतिक आदिवासी दिनानिमित्त पनवेलमध्ये उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले. जागतिक आदिवासी दिन उत्सव समिती पनवेलच्या वतीने रविवारी, ९ ऑगस्ट रोजी हा दिवस मोठ्या जल्लोषात साजरा करण्यात आला. पनवेल तालुक्यातील विविध भागांतील आदिवासी बांधव मोठ्या संख्येने या कार्यक्रमात सहभागी झाले होते. पारंपरिक वेशभूषा, सांस्कृतिक सादरीकरणे आणि आदिवासी संस्कृतीचे दर्शन घडवणाऱ्या विविध उपक्रमांमुळे कार्यक्रमाला विशेष रंगत आली.

पनवेल क्रीडा संकुल येथे आयोजित या कार्यक्रमाला पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष मयूरेश नेतकर, सिताराम चौधरी, गणपत वारगडा यांनी प्रमुख उपस्थिती लावली.



## सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर स्कूलची ११२ आपत्कालीन हेल्पलाइन हेड ऑफिसला भेट

**उलवे : रामप्रहर वृत्त**

सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर स्कूल, उलवे येथे आज विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने ११२ आपत्कालीन हेल्पलाइन व हेड ऑफिस भेटीचा विशेष उपक्रम आयोजित करण्यात आला. हा उपक्रम सहाय्यक पोलिस आयुक्त भानुदास खटावकर व नामदेव रेनके ( सेंटर हेड एम.ई.आर.एस ११२) आणि संपूर्ण टीम यांच्या विशेष सहकार्यामुळे यशस्वीरीत्या पार पडला.

या भेटीदरम्यान विद्यार्थ्यांना ११२ आपत्कालीन सेवेचे महत्त्व, तिचा योग्य वापर, आपत्कालीन परिस्थितीत घ्यावयाची खबरदारी आणि प्रसंगावधान याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. संकटाच्या प्रसंगी घाबरून न जाता शांतपणे परिस्थिती हाताळणे आणि आवश्यकतेनुसार योग्य मदत मिळविणे याविषयी विद्यार्थ्यांना महत्त्वपूर्ण माहिती देण्यात आली.

यावेळी विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत विविध प्रश्न विचारले. पोलिस प्रशासनाची कार्यपद्धती, नागरिकांची सुरक्षितता आणि आपत्कालीन सेवांची भूमिका याबाबतही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन मिळाले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये सुरक्षिततेची जाणीव, जबाबदारीची भावना, आत्मविश्वास आणि सामाजिक बांधिलकी निर्माण होण्यास मदत झाली.

या महत्त्वपूर्ण उपक्रमासाठी सहाय्यक पोलिस आयुक्त भानुदास खटावकर यांचे शाळेच्यावतीने मनःपूर्वक आभार मानण्यात आले.

## इनरव्हील क्लब पनवेल इंडस्ट्रियल टाऊनतर्फे जागतिक स्तनपान सप्ताहानिमित्त उपक्रम



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जागतिक ब्रेस्टफीडिंग (स्तनपान) सप्ताहाचे औचित्य साधून 'इनरव्हील क्लब ऑफ पनवेल इंडस्ट्रियल टाऊन'तर्फे आज पनवेल महानगरपालिका (PMC) हॉस्पिटल येथे एक अत्यंत महत्त्वपूर्ण आणि सामाजिक उपक्रम यशस्वीरीत्या राबविण्यात आला.

या उपक्रमांतर्गत नवीन मातांना आरोग्यदायी शतावरी कल्प, पौष्टिक राजगिरा लाडू आणि बिस्किट्सचे वाटप करण्यात आले.

डॉ. राजेश्री बागडे यांनी उपस्थित नवीन प्रसूती झालेल्या मातांना नवजात बालकासाठी आईच्या दुधाचे महत्त्व आणि बाळाची काळजी कशी घ्यावी, याबद्दल अत्यंत मोलाचे मार्गदर्शन केले.

हा प्रकल्प यशस्वी करण्यासाठी PMC हॉस्पिटलचे CMO डॉ. पाटील साहेब आणि गुरव सिस्टर यांचे मोलाचे सहकार्य लाभले. अध्यक्ष ॲड. शुभांगी बहिरा यांनी CMO डॉ. पाटील साहेब यांचे मनापासून आभार मानले. या प्रसंगी नगरसेविका दर्शना भोईर, डॉ. राजेश्री बागडे, प्रतिभा लादे आणि मेघना चांदोरकर या सदस्या उपस्थित होत्या. सर्व सहभागी सदस्यांचे क्लबतर्फे मनापासून आभार मानले.

# हर घर तिरंगा अभियानाची पनवेल महानगरपालिकेत उत्साही सुरुवात

### १७ ऑगस्टपर्यंत विविध कार्यक्रमांचे आयोजन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारताच्या स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर 'हर घर तिरंगा' अभियानांतर्गत पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील महाविद्यालयांमध्ये आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली विविध उपक्रमांचे उत्साहात आयोजन करण्यात येत आहे. विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रध्वजाबद्दल आदर, राष्ट्रप्रेम आणि देशभक्तीची भावना वृद्धिंगत करण्याच्या उद्देशाने आज डी. डी. विसपुते आणि केएलई महाविद्यालयात रांगोळी स्पर्धा, 'वंदे मातरम्' माहिती प्रदर्शन आणि तिरंगा रॅलीच्या माध्यमातून राष्ट्रभक्तीचा जागर करण्यात आला.







'हर घर तिरंगा' अभियानाची महापालिका क्षेत्रात प्रभावी अंमलबजावणी करण्यास आजपासून सुरुवात झाली असून, महाविद्यालयीन विद्यार्थी आणि युवकांचा अभियानात मोठ्या प्रमाणात सहभाग सुनिश्चित करण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत.

या अभियानांतर्गत आज डी. डी. विसपुते कॉलेज ऑफ एज्युकेशनतर्फे विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. यावेळी डी. डी. विसपुते समूहाचे अध्यक्ष धनराज विसपुते तसेच महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. सीमा कांबळे यांच्या प्रमुख उपस्थितीत 'हर घर तिरंगा' अभियानाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी रांगोळी स्पर्धा, 'वंदे मातरम्' माहिती प्रदर्शन व हर घर तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले.

### 'तिरंग्यासोबत सेल्फी काढून अभियानात सहभागी व्हा'

*'हर घर तिरंगा' अभियानाच्या माध्यमातून नागरिकांनी आपल्या घरावर अभिमानाने तिरंगा फडकवावा. तिरंग्यासोबत सेल्फी काढून harghartiranga.com या संकेतस्थळावर सेल्फी अपलोड करावी. तसेच #SelfieWithTiranga या हॅशटॅगसह सोशल मीडियावर पोस्ट करून देशभक्तीचा संदेश सर्वांपर्यंत पोहोचवावा, असे आवाहन परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे यांनी केले आहे.*

## संपादकीय

# सहकाराला नवी दिशा

देशभरातील शहरी सहकारी बँकांना अंब्रेला ऑर्गनायझेशनच्या माध्यमातून एकसंध आणि सक्षम व्यासपीठ उपलब्ध होणार आहे. राष्ट्रीय शहरी सहकारी वित्त व विकास महामंडळाचे मुख्यालय महाराष्ट्रात आणण्याचा निर्णय हा सहकार क्षेत्राच्या विकासासाठी निश्चितच अभिमानाची आणि आशादायी बाब आहे.

**भारताच्या आर्थिक विकासाच्या वाटचालीत सहकार क्षेत्राचे योगदान अनन्यसाधारण आहे. सामान्य माणसाला आर्थिक व्यवस्थेशी जोडण्याचे काम सहकारी संस्थांनी प्रभावीपणे केले आहे. विशेषतः अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकांनी छोट्या व्यावसायिकांपासून नोकरदार, मध्यमवर्गीय, लघुउद्योजक आणि स्वयंरोजगार करणाऱ्या नागरिकांपर्यंत बँकिंग सेवा पोहचविण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. आता बदलत्या काळानुसार या क्षेत्राला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देऊन त्याला अधिक व्यापक आणि सक्षम करण्याचा प्रयत्न सुरू झाला आहे, ही निश्चितच स्वागतार्ह बाब आहे. केंद्रीय सहकार मंत्री अमित शाह यांनी अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकिंग क्षेत्राला आधुनिक, पारदर्शक, विश्वासार्ह आणि तंत्रज्ञानाधिष्ठित बनविण्यात अंब्रेला ऑर्गनायझेशन महत्त्वाची भूमिका बजावेल, असा व्यक्त केलेला विश्वास या क्षेत्रासाठी आश्वासक आहे. देशातील प्रत्येक तहसीलपर्यंत अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकिंगचे जाळे विस्तारण्याचे उद्दिष्ट व्यापक वित्तीय समावेशनाच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरणार आहे. अंब्रेला ऑर्गनायझेशनमुळे देशातील शहरी सहकारी बँकांना सामूहिक बळ मिळण्याची शक्यता आहे. आधुनिक तंत्रज्ञान, डिजिटल बँकिंग, सायबर सुरक्षा, प्रशिक्षण, व्यवस्थापन कौशल्य आणि नवीन वित्तीय सेवा यांसारख्या क्षेत्रांत सामायिक सुविधा उपलब्ध झाल्यास सहकारी बँकांची कार्यक्षमता आणखी वाढू शकते. विशेषतः लहान आणि मध्यम आकाराच्या बँकांना आधुनिक बँकिंगच्या प्रवाहात वेगाने सहभागी होण्यासाठी याचा मोठा फायदा होईल. आजचा ग्राहक वेगवान, सुरक्षित आणि सुलभ बँकिंग सेवा अपेक्षित करतो. मोबाईल बँकिंग, इंटरनेट बँकिंग, डिजिटल पेमेंट आणि तत्काळ आर्थिक सेवा या आता केवळ मोठ्या बँकांपुरत्या मर्यादित राहिलेल्या नाहीत. सहकारी बँकांनीही या बदलत्या अपेक्षा स्वीकारल्या आहेत. त्यांना संस्थात्मक आणि तांत्रिक पाठबळ मिळाले, तर सहकारी बँकिंग क्षेत्र डिजिटल अर्थव्यवस्थेतील आपली भूमिका आणखी मजबूत करू शकते. या निर्णयातील आणखी एक महत्त्वाचा भाग म्हणजे राष्ट्रीय शहरी सहकारी वित्त आणि विकास महामंडळाचे मुख्यालय दिल्लीहून महाराष्ट्रात हलविण्याची घोषणा. महाराष्ट्राची ओळखच मुळात सहकाराच्या समृद्ध परंपरेशी जोडलेली आहे. दरम्यान, ग्रामीण आणि शहरी सहकाराच्या माध्यमातून राज्याने देशाच्या सहकार क्षेत्राला मोठे योगदान दिले आहे. त्यामुळे या महत्त्वाच्या संस्थेचे मुख्यालय महाराष्ट्रात येणे हा राज्याच्या सहकार क्षेत्राच्या योगदानाचा सन्मान मानता येईल. महाराष्ट्रात या संस्थेचे मुख्यालय आल्याने राज्यातील सहकारी बँकिंग क्षेत्राला नव्या संधी निर्माण होऊ शकतात. सहकार क्षेत्रातील अनुभवी मनुष्यबळ, संस्थात्मक क्षमता आणि प्रदीर्घ अनुभव यांचा राष्ट्रीय पातळीवर उपयोग होण्यास यामुळे मदत होईल. महाराष्ट्रातून देशभरातील शहरी सहकारी बँकिंगच्या विकासाला दिशा देण्याची संधी मिळणे ही राज्यासाठी निश्चितच अभिमानाची बाब आहे. अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकिंगचे जाळे प्रत्येक तहसीलपर्यंत पोहचविण्याची संकल्पना सामान्य नागरिकांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी खरंच महत्त्वपूर्ण बाब आहे.**

# आदिवासी विद्यार्थ्यांची आकाशाकडे झेप...

ज्या आदिवासी मुला-मुलींसाठी कधीकाळी जिल्ह्याचे ठिकाण गाठणेही मोठी गोष्ट होती, त्याच दुर्गम आदिवासी भागातील नवी पिढी आज विमानाने दिल्ली-मुंबई, हैदराबाद आणि बंगलोर गाठत आहे. देशाच्या राष्ट्रपतींशी संवाद साधत आहे, संसद भवन पाहत आहे, आयआयटी, इस्त्रो आणि विज्ञान केंद्रांना भेट देत आहे, मंत्रालय-विधान भवनाची कार्यपद्धती समजून घेत आहे. आपल्या गावाच्या, जंगलाच्या आणि परिचित परिसराच्या पलीकडे संधींचे किती विशाल विश्व आहे, हे ती प्रत्यक्ष अनुभवत आहे.

गडचिरोलीच्या दुर्गम आदिवासी भागातील एका विद्यार्थ्याने राष्ट्रपती भवनात भारताच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्यासमोर आत्मविश्वासाने उभे राहून, "मला शिक्षक व्हायचे आहे," असे सांगणे हा या परिवर्तनाचा बोलका क्षण आहे. त्यावर राष्ट्रपतींनी विद्यार्थ्यांना मोठी स्वप्ने पाहण्याचा आणि शिक्षण, मेहनत व चिकाटीच्या बळावर ती पूर्ण करण्याचा प्रेरणादायी संदेश दिला. ही केवळ एका आदिवासी विद्यार्थ्याची गोष्ट नाही. ही आदिवासीबहुल गडचिरोलीच्या नव्या पिढीच्या बदलत्या आकांक्षांची गोष्ट आहे. आपल्या समृद्ध संस्कृतीची मुळे जपत शिक्षण, विज्ञान, तंत्रज्ञान आणि आधुनिक संधींच्या दिशेने आत्मविश्वासाने पुढे जाणाऱ्या आदिवासी विद्यार्थ्यांच्या नव्या प्रवासाची ही सुरुवात आहे.

महाराष्ट्राच्या पूर्व टोकावर वसलेला गडचिरोली हा आदिवासीबहुल, वनव्याप्त आणि प्रामुख्याने ग्रामीण जिल्हा. घनदाट जंगले, नद्या-नाले, विपुल वनसंपदा आणि समृद्ध आदिवासी संस्कृती ही या जिल्ह्याची ओळख आहे. मात्र, भौगोलिक दुर्गमतेमुळे अनेक गावांतील नागरिकांचा मोठ्या शहरांशी प्रत्यक्ष संपर्क मर्यादित राहिला आहे. आजही दुर्गम भागातील अनेक नागरिकांनी जिल्हा मुख्यालय पाहिलेले नाही; नागपूर, मुंबई किंवा दिल्लीसारख्या महानगरांचा प्रत्यक्ष अनुभव तर अनेकांसाठी दूरची बाब आहे. या भौगोलिक अंतरामुळे आदिवासी मुलांच्या गुणवत्तेला किंवा क्षमतेला मर्यादा नसल्या, तरी त्यांच्या अनुभवविश्वाला मर्यादा येऊ शकतात. हीच दरी कमी करण्यासाठी शासन आणि जिल्हा प्रशासनाकडून शिक्षणासोबतच विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभवाच्या संधी उपलब्ध करून देण्यावर भर दिला जात आहे.



मुख्यमंत्री तथा गडचिरोली जिल्ह्याचे पालकमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली गडचिरोली जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाबरोबरच दुर्गम व आदिवासी भागातील नव्या पिढीला गुणवत्तापूर्ण शिक्षण, आधुनिक ज्ञान आणि व्यापक अनुभवाच्या संधी उपलब्ध करून देण्यावर विशेष भर दिला जात आहे. या व्यापक प्रयत्नांचाच एक भाग म्हणून विविध विभागांच्या माध्यमातून आदिवासी आणि दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना विमानाने देशातील महानगरांमध्ये शैक्षणिक अभ्यास दौऱ्यांची संधी उपलब्ध करून देण्यात आली. उद्देश केवळ मोठी शहरे दाखविण्याचा नाही; तर देशातील आधुनिक पायाभूत सुविधा, विज्ञान-तंत्रज्ञानातील प्रगती, उच्च शिक्षणाच्या संधी, लोकशाही व प्रशासकीय व्यवस्था आणि ऐतिहासिक-सांस्कृतिक वारसा प्रत्यक्ष अनुभवण्याची संधी देऊन येथील विद्यार्थ्यांच्या आकांक्षांना नवे क्षितिज देण्याचा आहे.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने मागील तीन वर्षात गडचिरोली जिल्ह्यातील शासकीय निवासी शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या एकूण ३६० विद्यार्थ्यांना विमानाने हैदराबाद, बंगळुरू व यावर्षी दिल्लीच्या शैक्षणिक अभ्यास दौऱ्याची संधी दिली. यातील अनेक विद्यार्थ्यांसाठी विमानप्रवासाचा हा पहिलाच अनुभव होता. नागपूर विमानतळावरून दिल्लीकडे विमानाने झेपावताना त्यांच्या चेहऱ्यावरील कुतूहल आणि आनंद त्यांच्या अनुभवविश्वात घडत असलेल्या बदलाची साक्ष देत होता. दिल्लीमध्ये राष्ट्रपती भवन, संसद भवन आणि राष्ट्रीय महत्त्वाच्या विविध स्थळांना भेट देऊन विद्यार्थ्यांनी देशाची लोकशाही व्यवस्था, इतिहास, संस्कृती आणि विकासाचे विविध आयाम समजून घेतले.

आदिवासी विकास विभागाने जिल्हा वार्षिक आदिवासी उपयोजनेतून गडचिरोली, अहेरी आणि भामरागड येथील शासकीय आश्रमशाळांमधील ९६ आदिवासी विद्यार्थ्यांसाठी दिल्ली शैक्षणिक अभ्यास दौरा आयोजित केला. या दौऱ्याचा सर्वाधिक प्रेरणादायी क्षण ठरला तो राष्ट्रपती भवनातील भेटीचा. भारताच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी गडचिरोलीच्या आदिवासी विद्यार्थ्यांचे आत्मीयतेने स्वागत केले. त्यांनी विद्यार्थ्यांची नावे, गावे, शिक्षण आणि भविष्यातील ध्येय जाणून घेतले. पोटेगाव येथील एका विद्यार्थ्याने शिक्षक होण्याची इच्छा व्यक्त केली. त्याच्या स्वप्नाचे कौतुक करत राष्ट्रपतींनी विद्यार्थ्यांना मोठी स्वप्ने पाहण्याचा आणि ती पूर्ण करण्यासाठी सातत्याने प्रयत्न करण्याचा संदेश दिला.

देशाच्या एका दुर्गम आदिवासी गावातून आलेला विद्यार्थी राष्ट्रपती भवनात देशाच्या प्रथम नागरिकांसमोर उभा राहून आत्मविश्वासाने आपल्या भविष्याचे स्वप्न सांगतो हा बदलत्या गडचिरोलीचा आणि नव्या आकांक्षांनी भरलेल्या आदिवासी पिढीचा अत्यंत आश्वासक क्षण आहे. या विद्यार्थ्यांनी संसद भवन, पंतप्रधान संग्रहालय, राष्ट्रीय विज्ञान केंद्र, आयआयटी दिल्ली, जंतरमंतर, राजघाट, लाल किल्ला, कुतुबमिनार आणि राष्ट्रीय प्राणीसंग्रहालयालाही भेट दिली. लोकशाहीपासून विज्ञानापर्यंत आणि इतिहासापासून उच्च शिक्षणापर्यंत देशाच्या विविध क्षेत्रांची ओळख त्यांना प्रत्यक्ष अनुभवातून झाली.

जिल्हा परिषद गडचिरोलीने ग्रामीण व दुर्गम भागातील विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेला प्रोत्साहन देण्यासाठी 'मिशन जिकतूर' हा नाविन्यपूर्ण उपक्रम सुरू केला आहे. या अंतर्गत शिष्यवृत्ती परीक्षेच्या गुणवत्ता यादीतील जिल्हा परिषद शाळांच्या विद्यार्थ्यांना विमानाने मुंबईच्या शैक्षणिक अभ्यास दौऱ्यावर नेण्यात आले. दौऱ्यात विद्यार्थ्यांनी महाराष्ट्राचे मुख्य सचिव तथा गडचिरोलीचे पालक सचिव राजेश अग्रवाल यांच्याशी संवाद साधून शिक्षक, डॉक्टर, कलेक्टर आणि पोलीस अधिकारी होण्याची स्वप्ने मांडली. तसेच मंत्रालय, विधानभवन, गेटवे ऑफ इंडिया, नेहरू विज्ञान केंद्र, तारांगणासह विविध ऐतिहासिक व शैक्षणिक स्थळांना भेट दिली. 'मिशन जिकतूर' अंतर्गत शिष्यवृत्ती व नवोदय प्रवेश परीक्षेची विशेष तयारी, तज्ज्ञ मार्गदर्शन, ओएमआर सराव आणि शिक्षकांचे उद्बोधन याद्वारे दुर्गम भागातील विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेला संधी आणि त्यांच्या आकांक्षांना नवी दिशा दिली जात आहे.

या उपक्रमांचे मूल्यमापन केवळ किती विद्यार्थ्यांनी विमानप्रवास केला किंवा किती स्थळांना भेट दिली एवढ्यावर करता येणार नाही. त्यांचा खरा परिणाम आदिवासी आणि दुर्गम भागातील विद्यार्थ्यांच्या विचारविश्वात व आकांक्षांमध्ये शोधावा लागेल. एखाद्या मुलाला 'वैज्ञानिक हो' असे सांगणे आणि त्याला प्रत्यक्ष विज्ञान केंद्र किंवा संशोधन संस्था दाखविणे यात फरक आहे. 'मोठा अधिकारी हो' असे सांगण्यापेक्षा संसद भवन, राष्ट्रपती भवन, मंत्रालय किंवा विधानभवनाची व्यवस्था प्रत्यक्ष अनुभवण्याची संधी देणे अधिक परिणामकारक आहे. आयआयटीचे नाव पुस्तकात वाचण्यापेक्षा त्या संस्थेच्या परिसरात उभे राहिल्यावर 'मीसुद्धा एक दिवस येथे शिकू शकतो' हा विचार मनात निर्माण होणे अधिक महत्त्वाचे आहे. विकास म्हणजे केवळ रस्ते, पूल, वीज व इमारती नव्हेत. विकास म्हणजे संधींची दारे खुली होणे, स्वक्षमतेची जाणीव निर्माण होणे व 'मीसुद्धा हे करू शकतो' हा आत्मविश्वास आदिवासी समाजाच्या मनात रुजणे. गडचिरोलीच्या आदिवासी समाजाची स्वतंत्र जीवनपद्धती, भाषा, लोककला, परंपरा आणि निसर्गाशी असलेले अतूट नाते ही जिल्ह्याची अमूल्य संपदा आहे.

**-गजानन जाधव,**
जिल्हा माहिती अधिकारी, गडचिरोली

## बदलते तंत्रज्ञान

# हॉटेलच्या रूममधील हिडन कॅमेरा असा शोधा

हॉटेलमध्ये चेक इन केल्यानंतर जेव्हा तुम्ही तुमच्या खोलीत जाल तेव्हा सीलिंग फॅनमधून लाल दिवा चमकत आहे का ते तपासा. यासाठी तुम्ही टॉर्च किंवा फ्लॅशलाईटचा वापर करू शकता. विचित्र वस्तूंकडे दुर्लक्ष करू नका तुम्ही खोलीत जाल तेव्हा अशी जागा शोधा जिथून बहुतेक खोली दिसू शकेल.



अशा ठिकाणी कॅमेरा लपवला जाऊ शकतो. यामध्ये विषमपणे, विचित्रपणे लावलेले आरसे किंवा इतर सजावटीच्या वस्तू असतात. एखादी वस्तू खोलीत असण्याची काहीच गरज नाही, किंवा योग्य जागी नाहीये, असं तुम्हाला वाटलं तर ती लगेच चेक करा.

अगदी अनावश्यक वाटणारी अतिरिक्त वायर देखील छुप्या कॅमेऱ्याला जोडलेली असू शकते.विद्युत उपकरणांमध्येही लपवू शकतात कॅमेरा लपविलेल्या उपकरणांना ऑपरेट करण्यासाठी वीज लागते. त्यामुळे, खोलीत विजेच्या अतिरिक्त तारा आहेत की नाही किंवा लुकलुकणारे दिवे आहेत का ते नीट तपासा.


छुपे कॅमेरे हे म्युझिक सिस्टीम किंवा अगदी टीव्हीच्या स्पीकर आणि स्पीकर मेशमध्ये सहजपणे ठेवलेले असतात. हे टॉर्चच्या प्रकाशाने शोधले जाऊ शकतात. कॅमेरा लपलेला आहे हे तुम्हाला नीट कळू शकले नाही, तर तुम्ही तो रुमाल, टॉवेल किंवा टिश्यू पेपरने झाकून ठेवू शकता.हुक किंवा टॉवेल होल्डरकडे लक्ष द्या खोलीतच नाही तर बाथरूममध्येही कॅमेरा लपवलेला असू शकतो. म्हणूनच, बाथरूम वापरण्यापूर्वी हुक, टॉवेल होल्डर किंवा हेअर ड्रायर होल्डर नीट तपासा.

फायर अलार्म किंवा स्मोक डिटेक्टर्ससामान्यतः लोक या गोष्टींकडे दुर्लक्ष करतात, परंतु तुम्हाला हे जाणून आश्चर्य वाटेल की या उपकरणांमध्येही कॅमेरा लपवला जाऊ शकतो. .डोअर नॉब, हँडल्सखोलीमध्ये अशी काही ठिकाणे आहेत जिथे कॅमेरे लपवले जाऊ शकतात आणि अनेकदा या जागा कोणाच्याही लक्षात येत नाहीत. म्हणून, दरवाजाचे नॉब, हँडल आणि दरवाजे देखील नीट तपासा.लाईट बंद करून लेन्स तपासाजर तुम्हाला कॅमेऱ्याचा लुकलुकणारा लाल दिवा दिसत नसेल तर एक सोपा उपाय आहे. खोलीतील सर्व दिवे बंद करा. लेन्सचा रिफ्लेक्टिव पृष्ठभाग अंधारात दिसू शकतो. सर्व दिवे बंद करा आणि लुकलुकणारे किंवा रिफ्लेक्टिव दिवे पहा.

तुमच्या बोटाचे नख आरशावर ठेवा, त्याचे प्रतिबिंब आरशात दिसतं का ते पहा. प्रतिबिंब व तुमचे बोट यांच्यामध्ये अंतर नसेल तर आरशाच्या उलट्या बाजूला कॅमेरा लावलेला असू शकतो.

# संगीत शास्त्रकार पं. विष्णू भातखंडे

भारतीय संगीताच्या विकासासाठी ज्या अनेक महापुरुषांनी आपले संपूर्ण जीवन समर्पित केले त्यामध्ये पं. विष्णू नारायण भातखंडे यांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागेल. ज्या काळामध्ये हिंदुस्थानी शास्त्रीय संगीताला सर्वच बाजूंनी प्रतिकूल परिस्थिती होती अशा कालखंडात पंडितजींनी भारतीय संगीतामध्ये लक्षणीय बदल घडवून त्याला नवीन दिशा देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले.



## निमित्त

पं. विष्णू नारायण भातखंडे यांचा जन्म १० ऑगस्ट १८६० रोजी मुंबईतील वाळकेश्वर या ठिकाणी कृष्ण जन्माष्टमीच्या दिवशी झाला. बालपणापासून त्यांना संगीताची आवड होती. त्यांचे आई-वडील दोघेही संगीतप्रेमी होते. विष्णू भातखंडे हे शाळेत एक हुशार विद्यार्थी होते. सन १८८३मध्ये बीए व १८९० साली एलएलबीची परीक्षा त्यांनी उत्तीर्ण केली व लाहोर शहरामध्ये वकिलीचा व्यवसाय त्यांनी सुरू केला. एकीकडे शैक्षणिक व व्यावसायिक क्षेत्रामध्ये काम करत असतानाच संगीताचा सखोल अभ्यासही त्यांनी सुरू ठेवला. पंडितजींनी संगीतातल्या अनेक तज्ज्ञांकडून विविध गोष्टींचे अध्ययन केले. ज्यामध्ये प्रामुख्याने पं. रावजीबुवा बेलबागकर यांच्याकडून धृपद गायकी, उ. अली हुसेन व उ. विलायत हुसेन यांच्याकडून ख्याल गायनाचे शिक्षण त्यांनी घेतले. धृपद व ख्याल गायकीबरोबरच सतार व बासरी वादन करण्यातही ते निपुण होते. सतार वादनाचेशिक्षण त्यांनी सेठ वल्लभदास यांच्याकडून घेतले. त्यांचे विविध मैफिली ऐकणे, संगीतावर अभ्यास करणे चालू होते. या दरम्यान पं. भातखंडे हे 'गायन उत्तेजक मंडळी' या संस्थेचे सभासद झाले. या संस्थेच्या माध्यमातून विविध कलाकारांच्या मैफलींचे आयोजन केले जात असे. अनेक मैफलींचे अवलोकन केल्यानंतर त्यांना कलावंताच्या प्रस्तुतीकरणामध्ये अनेक त्रुटी आढळून आल्या. अनेक गोष्टी खटकायला लागल्या. कुठेतरी हिंदुस्थानी संगीताची दुर्दशा होत आहे आणि त्याला योग्य दिशा दिली पाहिजे या दृष्टीने कलाकारांचे शास्त्रशुद्धतेकडे होणारे दुर्लक्ष, बंदिशींच्या शब्दांचे अशुद्ध, अस्पष्ट उच्चार, कलाकारांचा घराण्याबाबतचा दुराग्रह अशा अनेक बाबींवर विचार करून ह्यामधील तफावत दूर करण्याचा निश्चय त्यांनी केला.

पं. भातखंडे यांनी हिंदुस्थानी संगीत शास्त्राची नव्याने उभारणी करण्यासाठी भारत भ्रमण करायला सुरुवात केली. देशभरातल्या अनेक विद्वानांशी सखोल चर्चा करण्याच्या हेतूने त्यांनी अनेक परिसंवाद घडवले आणि संगीताच्या विविध विषयांवर अनेक व्याख्याने दिली, इतर प्रांतांतील व भाषांतील संगीतविषयक साहित्याचा अभ्यास करण्यासाठी त्यांनी अनेक भाषांचा अभ्यासही केला. अनेक दुर्मिळ ग्रंथांचा अभ्यास करून ग्रंथांचे संपादन व भाषांतर त्यांनी केले.

पं. भातखंडे यांनी भारतीय संगीतावर विविध भाषांमध्ये विविध टोपणनावांनी फार मोठी ग्रंथसंपदा लिहिली. 'स्वर मालिका हा त्यांचा गुजराथी भाषेत लिहिलेला प्रथम ग्रंथ होय. एक ते सहा या भागांतील क्रमिक पुस्तक मालिकेच्या माध्यमातून 'हिंदुस्थानी संगीत पद्धती' या पुस्तकाचे क्रमशः प्रकाशन त्यांनी केले. याचबरोबर 'अभिनव ताल मंजिरी' हा ग्रंथ संस्कृत भाषेत प्रकाशित केला. 'श्री मल्लक्ष संगीतम्' या ग्रंथाचे मराठी भाषांतर करून 'हिंदुस्थानी संगीत पद्धती' हा ग्रंथ त्यांनी लिहिला. लक्षणगीत संग्रह, गीतमालिका या पुस्तकांबरोबरच चार खंडांत संगीत शास्त्र, हृदय प्रकाश, रागविबोध प्रवेशिका, संगीत दर्पण, संगीत पारिजात व त्याही पुढे जाऊन 'संगीत नादोदधी' या ग्रंथांचे प्रकाशन आणि संपादन त्यांनी केले. इंग्रजी भाषेमध्ये शॉर्ट हिस्टॉरिकल सर्व्हे ऑफ म्युझिक ऑफ अप्पर इंडिया' आणि 'फिलॉसॉफी ऑफ म्युझिक' ही पुस्तके लिहिली. ही सर्व ग्रंथसंपदा त्यांनी चतुर पंडित, विष्णु शर्मा, मंजिरीकार, हररंग, भारद्वाज शर्मा अशा अनेक टोपण नावांनी लिहिली. अशा या महान कलावंताचे निर्वाण १९ सप्टेंबर १९३६ रोजी झाले. (साभार : संगीतजगत)

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# 'हा' पदार्थ पाण्यासोबत घ्या, पोट बिघडणार नाही!

पोटात गॅस होण्यासारख्या समस्या अनेकांना उद्भवतात. पोटात गरजेपेक्षा जास्त गॅस तयार झाल्यास त्यापासून सुटका मिळवण्यासाठी तुम्ही वेगवेगळ्या प्रकारचे उपाय करू शकता. जर तुमचं पोट फुगलं असेल आणि पोटात गॅस तयार झाला असेल तर काही सोपे उपाय करून तुम्ही पोटातील गॅसपासून सुटका मिळवू शकता. ओव्याचं पाणी हा एक कमालीचा उपाय आहे. याच्या सेवनाने गंभीर समस्याही टाळता येतील.



वेब एमडीच्या रिपोर्टनुसार ओव्याच्या सेवनाने पोटातील एसिड्स कमी होण्यास मदत होते. इन्डायजेशन, ब्लोटींग, गॅसची समस्याही उद्भवत नाही. यामुळे अल्सरचा त्रास कमी होतो. आतडे अन्ननलिका आणि पोट निरोगी राहते. उंदरांवर करण्यात आलेल्या एका अभ्यासात दिसून आले की, ओव्याच्या सेवनाने त्यातील थायमल अतिरिक्त कॅल्शियमला हार्टच्या ब्लड वेसल्समध्ये जाण्यापासून रोखते आणि ब्लड प्रेशर कमी होण्यास मदत होते. ओवा वेदना आणि सूज शांत करण्यासाठीदेखील प्रभावी ठरते.

जीरं फक्त पोटाचा त्रास दूर करत नाही तर अनेक समस्यांपासूनही सुटका मिळवून देतो. जिऱ्यात एंटी ऑक्सिडेंट्स असतात. यात आयर्न, कॅल्शियम आणि मॅग्नेशियम यांसारखी पोषक तत्व असतात. गॅस दूर करण्यासाठी एक चमचा जीरं व्यवस्थित कुटून एक ग्लास गरम पाण्यात घालून ५ ते १० मिनिटांसाठी तसंच ठेवून द्या. त्यानंतर गाळून या पाण्याचे सेवन करा. ज्यामुळे पोटात गॅस तयार होण्याची समस्या उद्भवत नाही.

जेव्हा पोट गरजेपेक्षा जास्त फुगते तेव्हा तुम्ही दही खाऊ शकता. दह्यात प्रोबायोटिक्स असतात, ज्यामुळे पोटाला गट बॅक्टेरियाज मिळतात आणि पोटात गॅस तयार होण्याची समस्या उद्भवत नाही.

जेव्हाही कधी पोट फुगते तेव्हा तुम्ही केळी खाऊ शकता. केळ्यात पोटॅशियम असते, ज्यामुळे शरीरातील फ्लुइड्स रेग्युलेट होण्यास मदत होते. पोटाच्या त्रासापासून आराम मिळतो.

बडीशेप खाल्ल्याने पोटाच्या समस्यांपासून आराम मिळतो. जेवणानंतर बडीशेप तुम्ही कच्ची खाऊ शकता किंवा यात पाणी घालूनही खाऊ शकता. बडीपशेपेमुळे पोट थंड राहण्यास मदत होते. पोटाच्या वेदना दूर होतात. याशिवाय बडीशेपेच्या सेवनाने पोटातील गॅस आणि ब्लोटींगचा त्रासही होत नाही.

# वणीमध्ये श्री सदस्यांचे श्रमदान



**खोपोली : प्रतिनिधी**

'आज लावलेले एक रोप म्हणजे उद्याच्या पिढीसाठी दिलेली हिरवीगार भेट' या भावनेतून डॉ. श्री नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानच्या वतीने खालापूर तालुक्यातील वणी येथील वनविभागाच्या जागेवर भव्य वृक्षारोपण उपक्रम राबविण्यात आला. डॉ. श्री. अप्पासाहेब धर्माधिकारी आणि डॉ. श्री. सचिनदादा धर्माधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली श्री बैठक खोपोली समितीच्या माध्यमातून तब्बल ५० हून अधिक श्री सदस्यांनी २०० रोपांची लागवड करून पर्यावरण संवर्धनाचा अनोखा संदेश दिला.

वनविभागाचे वन परीक्षक अधिकारी नितीन कांबळे यांच्या प्रमुख उपस्थितीत या वृक्षारोपण कार्यक्रमाला सुरुवात झाली. नितीन कांबळे यांच्या हस्ते रोपांचे विधिवत पूजन करून श्रीफळ वाढविण्यात आले आणि त्यानंतर वृक्षारोपणाला प्रारंभ करण्यात आला.

## ◆ दोन तासांत २०० रोपांचे वृक्षारोपण

विशेष म्हणजे या उपक्रमाची तयारी दोन दिवस आधीपासूनच सुरू होती. पाच एकरांहून अधिक क्षेत्रामध्ये शेकडो श्री सदस्यांनी तब्बल दोन फूट खोल खड्डे खोदले होते. त्यावेळीही श्री सदस्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कोणत्याही अपेक्षेशिवाय श्रमदान केले.आज सकाळी आठ वाजल्यापासून श्री सदस्यांनी अत्यंत शिस्तबद्ध आणि नियोजनबद्ध पद्धतीने वृक्षारोपणाला सुरुवात केली.

रोपांच्या उंचीनुसार योग्य अंतर ठेवून अभ्यासपूर्ण पद्धतीने लागवड करण्यात आली. त्यामुळे येत्या काही वर्षांत या परिसरात एक मोठी हिरवीगार वनराई उभी राहणार असल्याचे चित्र आजच्या उपक्रमातून पाहायला मिळाले. या श्रमदानाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे, प्रत्येक श्री सदस्य आपापल्या घरून घमेला, फावडे, टिकाव, पहार, कोयता यांसारखी आवश्यक साधने घेऊन या सेवाकार्यात सहभागी झाला होता. कोणतीही घाईगडबड नाही, कोणताही गोंधळ नाही. प्रत्येक जण आपले काम प्रामाणिकपणे आणि सेवाभावाने करताना दिसत होता. पाहता पाहता शेकडो हात एकत्र आले आणि २०० रोपांची लागवड अवघ्या दोन तासांत पूर्ण झाली. या उपक्रमातून केवळ रोपे लावली गेली नाहीत, तर पर्यावरण संवर्धनासोबतच 'सेवा, शिस्त आणि सामाजिक बांधिलकी'चा संदेशही समाजापर्यंत पोहोचला.

आज वणीच्या मातीत लावलेली ही छोटी-छोटी रोपे भविष्यात मोठी झाडे बनतील. त्यांच्या सावलीत पुढच्या पिढ्या विसावतील, पक्ष्यांना आसरा मिळेल आणि परिसर अधिक हिरवागार होईल. त्यामुळे आज श्री सदस्यांनी केलेले श्रमदान हे केवळ वृक्षारोपण नसून भावी पिढीसाठी निसर्गाची अमूल्य ठेव निर्माण करण्याचा संकल्प ठरला आहे. शेकडो हातांनी मातीत रुजवलेली ही २०० रोपे वणीच्या भूमीवर हिरवाईची नवी कहाणी लिहिणार आहेत.

# पांगोळी धनगरवस्ती ग्रामस्थांनी केले वलवण धरणाचे जलपूजन

**चौक : प्रतिनिधी**

लोणावळा आणि आजूबाजूच्या परिसराला पाणीपुरवठा करणारे वलवण धरण पूर्णपणे भरल्याने पांगोळी धनगरवस्तीतील ग्रामस्थांनी रविवारी विधिवत पूजा करून धरणाचे जलपूजन केले. पांगोळी धनगरवस्तीच्या बाजूला टाटाचे वलवण हे मोठे धरण आहे. या धरणाच्या पाण्यावर लोणावळा शहरासह आजूबाजूच्या अनेक वाड्या-वस्त्या अवलंबून आहेत. गेल्या दोन महिन्यांत मुसळधार पाऊस पडल्याने हे धरण पूर्ण क्षमतेने भरले आहे.

त्यामुळे ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले आहे. या धरणातील स्वच्छ पाणी पांगोळी धनगरवस्तीतील ग्रामस्थांसह आजूबाजूच्या परिसरातील नागरिक पिण्यासाठी वापरतात. धरण पूर्ण भरल्याच्या आनंदात ग्रामस्थांनी आज एकत्र येऊन धरणाची पूजा करून पाण्याचे जलपूजन केले. यावेळी बाळूमामा देवस्थान कमिटीचे अध्यक्ष तथा माजी आदर्श सरपंच बबन खरात, युवा नेते महादू जानकर, गंगाराम मरगळे, गंगाराम हिरवे, संतोष खरात, पुजारी बाळू जानकर, संजय ठीकडे, ज्ञानेश्वर जानकर, बाबू मरगळे यांच्यासह गावातील अनेक महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.



# क्रांतिदिनाच्या कार्यक्रमात राजकारण बाजूला ठेवावे -आमदार महेंद्र थोरवे

**कर्जत : प्रतिनिधी**

आजचा दिवस आपल्या तालुक्यासाठी अभिमानाचा दिवस आहे. माझ्या तालुक्याच्या दोन क्रांतिकारकांनी देशासाठी हौतात्म्य दिले ही बाब माझ्यासाठी अभिमानाची बाब आहे. पंचायत समितीचे सदस्यांना आणि जिल्हा परिषद सदस्यांची जबाबदारी सर्व लोकप्रतिनिधी यांनी समजून घेतली पाहिजे. हुतात्म्यांचे बलिदान हे आपल्या स्वतःसाठी नव्हते हे सर्वांनी समजून घ्यावे आणि यात राजकारण न आणता क्रांतिकारकांच्या कार्यक्रमात प्रामुख्याने उपस्थित राहिले पाहिजे. क्रांतिकारकांच्या कोणत्याही कार्यक्रमातून लोकसहभाग असला पाहिजे आणि त्यावेळी सर्व समाज घटकांनी एकत्र यावे, अशी अपेक्षा आमदार महेंद्र थोरवे यांनी यावेळी व्यक्त केली.

कर्जत तालुक्यातील मानिवली गावचे हुतात्मा हिराजी पाटील स्मारक येथे ऑगस्ट क्रांतिदिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. मानिवली ग्रामपंचायत, कर्जत पंचायत समिती शिक्षण विभाग यांच्या



माध्यमातून या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. यावेळी कार्यक्रमाची सुरुवात आमदार महेंद्र थोरवे यांच्या हस्ते राष्ट्रध्वज फडकवून झाली. त्यानंतर हुतात्मा हिराजी पाटील यांच्या अर्धपुतळ्याला आमदार महेंद्र थोरवे आणि पोलीस अधिकारी राहुल वारोटे यांचे हस्ते पुष्पचक्र वाहण्यात आले. यावेळी पोशीर येथील श्रमजीवी विद्यालय यांच्या एनसीसी पथकाने संचालन करून क्रांतिकारकांना अभिवादन केले. यावेळी जिल्हा परिषदेचे माजी सभापती नारायण डामसे, पंचायत समिती सदस्य नितीन धुळे, माजी सभापती अमर मिसाळ, सुजाता मनवे, माजी उपसभापती अरविंद पाटील, पोलीस अधिकारी राहुल वरोटे, तालुका शिक्षण अधिकारी अनंत खैरे, युवासेनेचे जिल्हाप्रमुख प्रसाद थोरवे, हुतात्म्यांचे नातेवाईक विठ्ठल पाटील, शेखर भडसावळे, शरद भगत, अनुसया जामघरे, मानीवली हुतात्मा स्मारक समितीचे अध्यक्ष प्रवीण डायरे आदींसह अनेक मान्यवर उपस्थित होते.

मुख्य कार्यक्रम क्रांतिकारक गोमाजी पाटील सभागृहात आयोजित करण्यात आला होता. त्याआधी माणिवली येथील हुतात्मा स्मारक बांधण्यासाठी पावणे चार एकर जमीन देणाऱ्या शेतकऱ्यांच्या ऋणनिर्देश करणाऱ्या नामफलकाचे अनावरण आमदार थोरवे यांच्या हस्ते करण्यात आले, तर विविध ठिकाणावरून मशाल घेऊन येणाऱ्या शाळांचा सन्मान करण्यात आला.

# कर्जत नगरपरिषदेच्या वतीने हुतात्म्यांना अभिवादन!

**कर्जत : प्रतिनिधी**

आज ऑगस्ट क्रांतिदिनी कर्जत नगरपरिषदेच्या वतीने आमराई येथील हुतात्मा स्तंभाच्या येथे कर्जत तालुक्यातील हुतात्म्यांना तसेच दिवंगत स्वातंत्र्य सैनिकांना अभिवादन करण्यात आले. कर्जत शहरातील आमराई येथील हुतात्मा स्तंभाला तेथे नगराध्यक्ष पुष्पा दगडे, उपनगराध्यक्ष संतोष पाटील यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. याप्रसंगी नगरसेवक अशोक राऊत, नगरसेविका अरुणा वायकर, सुचिता खोत, नेहा शिंदे, सुमिता गायकवाड, जान्हवी देवघरे, राधिका पवार, कार्यालयीन अधीक्षक रवींद्र लाड, इतिहास अभ्यासक वसंत कोळंबे, भगवान धुळे, विजय कोंडीलकर, मोहन सुर्वे, बाळासाहेब मोरे आदी उपस्थित होते.

वसंत कोळंबे यांनी कर्जत तालुक्यातील हुतात्मा भाई कोतवाल, हुतात्मा हिराजी पाटील आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी स्वातंत्र्यासाठी केलेल्या कार्याची माहिती सांगितली. भगवान धुळे यांनी स्मृती स्तंभ परिसराच्या भिंतींना टाईल्स लावाव्यात, अशी सूचना केली. यावेळी सुदेश देवघरे, रामचंद्र खरमरे, श्रीकांत आगीवले, सुनील कोळंबे, कल्याणी लोखंडे, बापू बहिरम, रुपेश पाटील, सुदेश गायकवाड उपस्थित होते.



# भात पिकाच्या संरक्षणासाठी शेतकरी व्यस्त

**खोपोली : प्रतिनिधी**

भात लागवडीची कामे पूर्ण झाल्यानंतर आता भातशेतीमध्ये उगवलेल्या तणांवर नियंत्रण मिळविण्यासाठी शेतकरी आणि शेतमजूरांची धावपळ सुरू झाली आहे. पावसाळ्यातील पोषक वातावरणामुळे भात पिकासोबतच गवत आणि विविध प्रकारच्या तणांची वाढ मोठ्या प्रमाणात होत आहे. त्यामुळे वेळेत तण काढून शेत स्वच्छ ठेवण्यावर शेतकऱ्यांनी भर दिला आहे.भात पिकाला वाढीसाठी आवश्यक असलेले पाणी, अन्नद्रव्ये आणि सूर्यप्रकाश तणांमुळे मोठ्या प्रमाणात खर्च होतो. त्याचा थेट परिणाम भाताच्या रोपांच्या वाढीवर होतो आणि पुढे उत्पादन घटण्याची शक्यता असते. त्यामुळे भात लागवडीनंतरच्या काळात तण नियंत्रणाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.सध्या ग्रामीण भागातील अनेक ठिकाणी शेतकरी आणि शेतमजूर सकाळपासूनच भाताच्या शेतांमध्ये तण काढण्याच्या कामात व्यस्त



आहेत. हाताने तण काढण्याबरोबरच आवश्यकतेनुसार इतर पद्धतींचाही वापर केला जात आहे. पावसाळ्यातील दमट वातावरण आणि शेतातील ओलाव्यामुळे तणांची वाढ वेगाने होत असल्याने शेतकऱ्यांना वारंवार तण काढावे लागत आहे.भात पिकाची निरोगी वाढ होऊन चांगले उत्पादन मिळावे, यासाठी शेतकरी मेहनत घेत आहेत. यंदाच्या हंगामात भाताचे भरघोस उत्पादन मिळावे आणि मेहनतीचे योग्य फळ मिळावे, अशी अपेक्षा शेतकरी व्यक्त करीत आहेत.

# जिल्हा परिषद शाळांना फिल्टर आणि प्रिंटरची भेट

**तळा : प्रतिनिधी**

संयुक्त कोकण विकास सामाजिक संस्था (रजि) ठाणे यांच्या विद्यमाने तळा तालुक्यातील जिल्हा परिषद शाळा आनंदवाडी व मेढे आदिवासी या शाळांना मान्यवरांच्या हस्ते प्रिंटर व वॉटर फिल्टर देण्यात आले.

या संस्थेच्या माध्यमातून शाळेला दिलेल्या या वस्तू विद्यार्थ्यांना उपयोगी असून विद्यार्थ्यांना शुध्द पाणी मिळेल तसेच शैक्षणिक कामाच्या दृष्टीने विद्यार्थ्यांना व शाळेला प्रिंट काढण्यासाठी प्रिंटरचा उपयोग होणार आहे. यामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी उपयोग होणार आहे. तसेच यावेळी पालक व विद्यार्थी, ग्रामस्थ यांच्यात उत्साह दिसत होता. यावेळी संस्थेचे पदाधिकारी, नागरिक व मान्यवर उपस्थित होते.



# कर्जत बार असोसिएशनच्या अध्यक्षपदी ॲड. किशोर देशमुख




**कर्जत** : कर्जत तालुका न्यायालयात कार्यरत असलेल्या कर्जत बार असोसिएशनच्या अध्यक्षपदी ॲड. किशोर देशमुख यांची, तर उपाध्यक्ष म्हणून ॲड. संदीप बागडे यांची निवड करण्यात आली आहे.कर्जत तालुक्यातील संपूर्ण वकिलांची कर्जत बार असोसिएशन आहे. या बार असोसिएशनच्या २०२६-२७ वर्षासाठी कर्जत येथील बार कौन्सिल कार्यालयात ज्येष्ठ वकिलांच्या उपस्थितीत निवडणूक पार पडली. या निवडणुकीत अध्यक्षपदासाठी ॲड. किशोर देशमुख यांची निवड करण्यात आली तसेच उपाध्यक्ष ॲड. संदीप बागडे यांचे अर्ज आले होते. ॲड. संदीप बागडे यांनी अर्ज मागे घेतल्याने अध्यक्ष म्हणून ॲड. किशोर देशमुख यांची बिनविरोध निवड करण्याात आली. तसेच उपाध्यक्ष म्हणून ॲड. संदीप बागडे यांची निवड करण्यात आली. या निवडणुकीचे निवडणूक निर्णय अधिकारी ॲड. महेश घारे यांनी अध्यक्षांची निवड जाहीर केली.

# वावेहवेली धरण परिसर पर्यटकांनी फुलला!

**तळा : प्रतिनिधी**

दोन दिवसांपासून पावसाचे प्रमाण कमी झाल्याने तळा तालुक्यातील वावेहवेली धरण परिसरातील धबधबे शनिवार आणि रविवारी पर्यटकांनी फुलून गेले होते. मुंबई-गोवा महामार्गापासून सुमारे एक कि.मी. अंतरावर वावेहवेली धरण आहे. या धरण परिसरातील निसर्गरम्य वातावरण आणि विविध धबधबे पर्यटकांसाठी आकर्षणाचे केंद्र ठरत आहेत.



निसर्गाचा आनंद लुटण्यासाठी शनिवार-रविवारच्या सुट्टीत मुंबई, पुणे तसेच जिल्ह्यातील विविध भागांतून मोठ्या संख्येने पर्यटक येथे आले होते.वावेहवेली येथील धबधब्याच्या पाण्याच्या प्रवाहात पर्यटक तसेच तरुण मौजमजा करताना, पाण्यात उड्या मारताना दिसत होते. त्यामुळे या परिसरात सध्या पर्यटनाचे उत्साही वातावरण निर्माण झाले आहे. मात्र, पर्यटकांच्या दृष्टीने येथे आवश्यक सोयी-सुविधा उपलब्ध करून दिल्यास पर्यटकांची संख्या आणखी वाढण्यास मदत होईल.

पर्यटकांची संख्या वाढल्यास स्थानिक नागरिकांनाही व्यवसायाच्या संधी उपलब्ध होऊ शकतात. अनेक पर्यटक आपले खाद्यपदार्थ व जेवण सोबत घेऊन येतात. त्यामुळे स्थानिक पातळीवर खाद्यपदार्थ, चहा-नाश्ता तसेच इतर सुविधा उपलब्ध करून दिल्यास स्थानिकांना आर्थिक फायदा होऊ शकतो. वावेहवेली धरण परिसराचा पर्यटनस्थळ म्हणून विकास करण्यासाठी सोयी सुविधांकडे लक्ष देण्याची गरज आहे.

# मतदार गणना अर्ज दाखल करण्याची १७ ऑगस्टपर्यंत शेवटची संधी

## एसआयआर अंतर्गत कॅम्प



**नवी मुंबई : बातमीदार**

मतदार याद्यांचा विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रम ३० जूनपासून सुरू असून त्या अंतर्गत गणनाअर्ज दाखल करण्यास आता १७ ऑगस्टपर्यंत मुदतवाढ जाहीर करण्यात आलेली आहे. ही अखेरचीच मुदतवाढ असून या मुदतीत नागरिकांनी आपले मतदार गणनाअर्ज संबंधित मतदान केंद्र अधिकारी यांचेकडे जमा न केल्यास प्रारूप मतदार यादीतून त्या मतदाराचे नाव वगळले जाणार आहे.

त्यामुळे मतदारयादीत पुन्हा नाव समाविष्ट करण्यासाठी फॉर्म ६ भरून सर्व प्रक्रिया नव्याने करावी लागणार आहे. तरी मतदार नागरिकांनी याची गांभीर्याने नोंद घेऊन मतदारयादीत आपले नाव राहण्यासाठी आपले गणनाअर्ज आपल्या मतदारयादी भाग क्रमांकाच्या बीएओकडे जमा करावेत असे आवाहन करण्यात येत आहे.

महत्वाचे म्हणजे गणनाअर्ज भरताना सन २००२ च्या यादीत आपला वा आपल्या पालकांच्या नावाचा तपशील सापडला नाही तरीही फक्त गणनापत्राच्या कॉलम ३ मध्ये आपली सध्याची माहिती भरून व आपली स्वाक्षरी करून मतदार नागरिकांनी आयोगाने जाहीर केलेल्या कागदपत्रांपैकी एक कागदपत्र त्या अर्जासोबत जोडून आपले गणनाअर्ज आपल्या भागातील बीएलओ यांच्याकडे जमा करावेत असेही सूचित करण्यात येत आहे.

नागरिकांच्या सोयीसाठी महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार या शनिवारी, रविवारीही दि. ८ व ९ ऑगस्ट २०२६ रोजी विशेष एसआयआर कॅम्प १७९ ठिकाणी सुरू ठेवण्यात येत असून आपल्या भागातील एसआयआर कॅम्पच्या ठिकाणांची माहिती नागरिकांना पुढील लिंकवर सहजपणे उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. लिंकवर एसआयआर विशेष कॅम्प ठिकाणे सहज उपलब्ध आहेत.

त्याचप्रमाणे विशेषत्वाने १५० ऐरोली मतदारसंघात ज्या भाग क्रमांकामध्ये गणना अर्जांचे संकलन व डिजीटलायझेनचे प्रमाण कमी आहे त्या ठिकाणी सायं. ७ ते १० या वेळेत आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांचे निर्देशानुसार विशेष कॅम्प आयोजित करण्यात येत आहेत. या माध्यमातून ज्या भागांमध्ये नागरिकांना कामाला जाण्याच्या व येण्याच्या वेळी उशीरा आहेत त्यांना आपला गणनाअर्ज भरून बीएलओ यांच्याकडे जमा करणे सोयीचे ठरेल.

नागरिकांना आपल्या मतदार यादी भाग क्रमांकाचे बीएलओ कोण आहेत याची माहिती लिंकवर उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. आजपर्यंत १५० ऐरोली विधानसभा मतदारसंघात ४,९७,३८० मतदारांपैकी ४,७१,५९७ गणनाप्रपत्रांचे वितरण झालेले असून २,३६,००१ गणनाप्रपत्रे मतदारांकडून बीएलओंकडे माहिती भरून जमा करण्यात आलेली आहेत व त्यांचे डिजिटलायझेशन पूर्ण झालेले आहे.

त्याचप्रमाणे, १५१ बेलापूर विधानसभा मतदारसंघातील ४,२२,३१७ मतदारांपैकी ४,१४,५५५ गणनाप्रपत्रांचे वितरण झालेले असून २,२७,९५० गणनाप्रपत्रे मतदारांकडून बीएलओंकडे आवश्यक माहिती भरून जमा झालेली आहेत व त्यांचे डिजिटलायझेशन पूर्ण झालेले आहे.

गणनाप्रपत्रे दाखल करण्यासाठी आता १७ ऑगस्टपर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली असून ही अखेरची संधी समजून नागरिकांनी मतदार यादीत आपले नाव अबाधित राहण्यासाठी आपले गणनाप्रपत्र संबंधित बीएलओकडे शेवटच्या तारखेपर्यंत न थांबता या शनिवारी, रविवारी आपल्या भागात लागणा-या विशेष कॅम्पमध्ये जमा करावे असे आवाहन अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी तथा नमुंमपा अतिरिक्त आयुक्त श्री.सुनिल पवार यांनी केले आहे.

नागरिकांना आपल्या मतदार यादी भाग क्रमांकाचे बीएलओ कोण आहेत याची माहिती – लिंकवर उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

आजपर्यंत १५० ऐरोली विधानसभा मतदारसंघात ४,९७,३८० मतदारांपैकी ४,७१,५९७ गणनाप्रपत्रांचे वितरण झालेले असून २,३६,००१ गणनाप्रपत्रे मतदारांकडून बीएलओंकडे माहिती भरून जमा करण्यात आलेली आहेत व त्यांचे डिजिटलायझेशन पूर्ण झालेले आहे.

त्याचप्रमाणे, १५१ बेलापूर विधानसभा मतदारसंघातील ४,२२,३१७ मतदारांपैकी ४,१४,५५५ गणनाप्रपत्रांचे वितरण झालेले असून २,२७,९५० गणनाप्रपत्रे मतदारांकडून बीएलओंकडे आवश्यक माहिती भरून जमा झालेली आहेत व त्यांचे डिजिटलायझेशन पूर्ण झालेले आहे. गणनाप्रपत्रे दाखल करण्यासाठी आता १७ ऑगस्टपर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली असून ही अखेरची संधी समजून नागरिकांनी मतदार यादीत आपले नाव अबाधित राहण्यासाठी आपले गणनाप्रपत्र संबंधित बीएलओकडे शेवटच्या तारखेपर्यंत न थांबता या शनिवारी, रविवारी आपल्या भागात लागणा-या विशेष कॅम्पमध्ये जमा करावे असे आवाहन अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी तथा नमुंमपा अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार यांनी केले आहे.

# एमजीएलमधील कथित डेटा गळतीमुळे मोठा सायबर घोटाळा

**नवी मुंबई : बातमीदार**

महानगर गॅस लिमिटेड(एमजीएल)च्या ग्राहकांची गोपनीय माहिती कथितपणे बाहेर गेल्यामुळे संघटित सायबर फसवणूक करणाऱ्यांना ग्राहकांना लक्ष्य करून लाखो रुपयांची फसवणूक करणे शक्य झाले असल्याचा गंभीर आरोप करत, अशाच एका मोठ्या सायबर फसवणुकीचा बळी ठरलेल्या व्यक्तीने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे उच्चस्तरीय चौकशी आणि एमजीएलच्या ग्राहक माहिती व्यवस्थेचे फॉरेन्सिक ऑडिट करण्याची मागणी केली आहे.

पंतप्रधान सार्वजनिक तक्रार पोर्टलवर दाखल केलेल्या निवेदनात नॅटकनेक्ट फाउंडेशनचे संचालक बी. एन. कुमार यांनी म्हटले आहे की, हा केवळ सायबर फसवणुकीचा प्रकार नसून एमजीएलच्या ग्राहकांची गोपनीय माहिती कथितपणे संघटित सायबर गुन्हेगारांच्या हाती गेल्याचा गंभीर मुद्दा आहे. या माहितीच्या आधारे ते एमजीएलचे अधिकारी असल्याचे भासवून ग्राहकांना लक्ष्य करत असल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

तक्रारीनुसार, एमजीएलचे अधिकारी असल्याचे सांगणाऱ्या फसवणूक करणाऱ्यांनी कुमार यांना केवळ १२ रुपयांचे गॅस बिल थकीत असल्याचे सांगून संपर्क साधला. त्यांनी कुमार यांचा एमजीएल ग्राहक क्रमांक आणि नोंदणीकृत मोबाईल क्रमांक



अचूक सांगितल्याने कॉलवर विश्वास बसला. त्यानंतर एमजीएलचा लोगो असलेल्या बनावट पेमेंट पेजवर पैसे भरण्यास सांगण्यात आले.

कुमार यांनी कोणताही ओटीपी दिला नसल्याचा दावा केला आहे. मात्र, या संवादादरम्यान त्यांचा मोबाईल फोन हॅक करण्यात आला आणि दोन वेगवेगळ्या बँकांच्या क्रेडिट कार्डांमधून १.६७ लाख रुपयांहून अधिक रकमेचे अनधिकृत व्यवहार करण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

तक्रारीत नमूद करण्यात आले आहे की, ग्राहक क्रमांकासारखी गोपनीय माहिती फक्त साध्या फिशिंगद्वारे मिळू शकत नाही. त्याच पद्धतीने थकीत गॅस बिलाचे कारण, गॅस जोडणी तोडण्याची धमकी आणि बनावट पेमेंट लिंक अनेक एमजीएल ग्राहकांना लक्ष्य करण्यात आल्याची माहिती असून, हा एखादा वेगळा प्रकार नसून संघटित आणि सातत्याने सुरू असलेला सायबर फसवणुकीचा प्रकार असल्याचा दावा करण्यात आला आहे.

"प्रश्न ग्राहकांच्या जागरूकतेचा नाही; तर एमजीएलच्या ग्राहकांची गोपनीय माहिती कथितपणे संघटित सायबर गुन्हेगारांच्या हाती कशी पोहोचली, हा आहे," असे निवेदनात म्हटले आहे. केवळ ग्राहकांनी सावध राहावे, असे आवाहन करून उपयोग नाही; माहिती गळतीचा स्रोत शोधून ती त्रुटी तातडीने दूर करणे आवश्यक असल्याचेही त्यात नमूद करण्यात आले आहे.

कुमार यांनी एमजीएलकडेही स्वतंत्र तक्रार दाखल करून ग्राहक माहितीच्या कथित तडजोडीची फॉरेन्सिक चौकशी करण्याची मागणी केली आहे. त्याचबरोबर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनाही निवेदन पाठवून त्याच्या प्रती महाराष्ट्राचे पोलीस महासंचालक आणि मुंबई पोलीस आयुक्त यांना देण्यात आल्या असून समन्वित चौकशीची मागणी करण्यात आली आहे.

पंतप्रधान कार्यालयाने पेट्रोलियम व नैसर्गिक वायू मंत्रालय, इलेक्ट्रॉनिक्स व माहिती तंत्रज्ञान मंत्रालय आणि संबंधित सायबर सुरक्षा यंत्रणांना स्वतंत्र फॉरेन्सिक चौकशीचे निर्देश द्यावेत, डिजिटल पर्सनल डेटा प्रोटेक्शन (DPDP) कायदा, २०२३ अंतर्गत संभाव्य उल्लंघनांची तपासणी करावी, माहिती गळतीचा स्रोत शोधावा, जबाबदारी निश्चित करावी आणि ग्राहकांच्या माहितीच्या सुरक्षेसाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

## स्वातंत्र्यदिनानिमित्त नवी मुंबईत 'मानव साखळी' व सामूहिक 'वंदे मातरम' गायनाचे आयोजन

**नवी मुंबई : बातमीदार**

स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने वंदे मातरम् सामाजिक संस्थान यांच्या वतीने शुक्रवार, १५ ऑगस्ट २०२६ रोजी नवी मुंबईत भव्य सार्वजनिक राष्ट्रीय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमामध्ये मानव साखळी उभारणे तसेच सामूहिकरित्या 'वंदे मातरम्' या राष्ट्रगीताचे गायन करण्यात येणार असल्याचे आयोजक वंदे मातरम् प्रतिष्ठानचे सदस्य नित्यानंद नायडू यांनी माहिती देताना सांगितले.

हा कार्यक्रम सकाळी १०.०० ते ११.३० या वेळेत पाम बीच रोडवरील एनएमएमसी मुख्यालय, सीबीडी बेलापूर ते मोराज सर्कल, सानपाडा या मार्गावर आयोजित करण्यात आला आहे. पक्षीय राजकारणापलीकडे जाऊन सर्व नागरिकांनी कुटुंबीय व मित्रपरिवारासह मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन आयोजकांनी नवी मुंबईकरांना केले आहे.

मानव साखळीच्या माध्यमातून राष्ट्रीय एकात्मता, देशभक्ती आणि सामाजिक ऐक्याचा संदेश देण्याबरोबरच सामूहिक 'वंदे मातरम्' गायनातून राष्ट्राभिमान अधिक दृढ करण्याचा या उपक्रमाचा उद्देश असल्याचे संस्थेने सांगितले. या कार्यक्रमाबाबत अधिक माहितीसाठी वंदे मातरम् प्रतिष्ठान, नवी मुंबई यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## बेलापूर रेल्वे स्थानकावर रक्तदान शिबिर

### १५० रक्तपिशव्यांचे संकलन

**नवी मुंबई : बातमीदार**

एनसीआरडी स्टर्लिंग इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी नेरूळच्या एनसीसी युनिट एसडी ६८ तसेच जगजीवन राम रुग्णालय यांच्या सहकार्याने बेलापूर रेल्वे स्थानकावर रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराला नागरिक तसेच स्वयंसेवकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.या एकदिवसीय रक्तदान शिबिरात तब्बल १५० रक्तपिशव्यांचे संकलन करण्यात आले.



रक्ताची गरज असलेल्या रुग्णांना वेळेवर रक्त उपलब्ध व्हावे आणि रक्तदानाबाबत समाजामध्ये जनजागृती व्हावी, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.शिबिरास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रुपेश पिंगळे, अनिल गरे तसेच एनएसएस स्वयंसेवकांची उपस्थिती होती.

स्वयंसेवकांनी रक्तदात्यांना मार्गदर्शन करण्यासह शिबिराच्या आयोजनामध्ये महत्त्वाची भूमिका बजावली.या रक्तदान शिबिराचे समन्वयन एनएसएस कार्यक्रम अधिकारी डॉ. दीपक पोखरकर यांनी केले. सामाजिक बांधिलकी जपत आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

## डॉ. डी. वाय. पाटील यांच्या स्मरणार्थ आदरांजली सभा

**नवी मुंबई : बातमीदार**

शिक्षण, आरोग्य, क्रीडा, राजकारण आणि समाजकारणात अतुलनीय योगदान दिलेले शिक्षण महर्षी डॉ. डी. पाटील यांच्या स्मृतीप्रित्यर्थ येत्या ११ ऑगस्ट रोजी नेरूळ येथे एका विशेष आदरांजली सभेचे आयोजन करण्यात आले आहे.

या आदरांजली सभेच्या माध्यमातून त्यांच्या उत्तुंग व्यक्तिमत्त्वाला आणि महान कार्याला अभिवादन केले जाणार आहे. त्यांच्या जीवन प्रवासाने प्रेरित झालेल्या आणि त्यांच्या विचारांचा प्रभाव असलेल्या सर्व नागरिकांच्या उपस्थितीत त्यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

ही आदरांजली सभा मंगळवार, ११ ऑगस्ट रोजी दुपारी ३ ते संध्याकाळी ७ या वेळेत नेरूळ इथल्या डी. वाय. पाटील विद्यापीठ, नवी मुंबई, सेंटर ऑफ एक्सीलेंस येथे आयोजित करण्यात आली आहे.

## महिला स्वयंरोजगारासाठी विविध प्रकारचे प्रशिक्षण

**नवी मुंबई : बातमीदार**

महाराष्ट्र शासन नागरी विकास व स्वच्छ भारत अभियान अंतर्गत बचत गट ,अशासकीय संस्था आणि महिलासाठी विविध उपजीविका व स्वरोजगारच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी महिलांसाठी मोफत प्रशिक्षण कार्यक्रम ८ऑगस्ट रोजी आयोजित करण्यात आला होता. प्रभाग क्रमांक २१ मधील महिला बचत गट ,मंडळे यांनी प्रशिक्षणा मध्ये ८० हून अधिक महिलांनी सहभाग नोंदविले. स्थानिक नगरसेविका माधुरी सुतार यांच्यातर्फे महिलांना स्वावलंबी होण्यासाठी व त्यांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी विशेष प्रयत्न केले जात आहेत



केंद्रीय सुका कचरा प्रक्रिया केंद्र चालविणे, आरआरआर केंद्र चालवणे, ई (E) कचरा केंद्र चालविणे.जुन्या कपडे पुर्नवापर तथा पुननिर्मितीसाठी प्रशिक्षण , प्लास्टिक कचऱ्याचा पुनर्वापर करण्याहेतु प्रशिक्षण, फुलांच्या निर्मल्यापासून सुगंधित अगरबती खत तयार करणे सहा विविध उपक्रमाचे प्रशिक्षण वर्ग घेण्यात आले. यावेळी प्रशिक्षक अरविंद दत्त व दुर्गा फाउंडेशनच्या संस्थापिका शोभा भोईर यांच्यातर्फे उपस्थित महिलांना मार्गदर्शन करण्यात आले. प्रभागाच्या महिला संघटिका मीनाक्षी हिलाल व स्मिता माने यांचे विशेष सहाय्य लाभले.

## कोपरखैरणेत उडान कार्यक्रम उत्साहात

**नवी मुंबई :बातमीदार**

गजानन चॅरिटेबल संस्था यांच्या वतीने "उडान २०२६ फ्युचर कनेक्ट आणि फ्रेशर्स सेलिब्रेशन" या कार्यक्रमाचे आयोजन ८ ऑगस्ट २०२६ रोजी करण्यात आले होते.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुण्या म्हणून डॉ. पूजा रौंदळे, संचालक, परीक्षा व मूल्यमापन विभाग, मुंबई विद्यापीठ, तसेच डॉ. गणेश रामदास भगुरे, प्राचार्य, सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालय (स्वायत्त), ठाणे आणि संस्थेचे सचिव डॉ. व्ही. टी. पाटील उपस्थित होते.




मान्यवरांनी विद्यार्थ्यांना करिअर नियोजन, उच्च शिक्षण, कौशल्य विकास तसेच भविष्यातील ध्येयांसाठी आवश्यक तयारी याबाबत मार्गदर्शन केले. एचएससी परीक्षेतील गुणवंत विद्यार्थी तसेच उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या माजी विद्यार्थ्यांचा ट्रॉफी देऊन सत्कार करण्यात आला. तसेच नव्याने निवड झालेल्या विद्यार्थी परिषदेची घोषणा करून विद्यार्थ्यांना बॅज प्रदान करण्यात आले.

कार्यक्रमात सांस्कृतिक कार्यक्रम, सरस्वती वंदना तसेच उच्च शिक्षण आणि विविध करिअर संधींबाबत मार्गदर्शनपर सत्र आयोजित करण्यात आले. कनिष्ठ महाविद्यालय व पदवी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित फ्रेशर्स सेलिब्रेशनने कार्यक्रमात उत्साह व आनंदाची भर घातली. विद्यार्थ्यांसाठी हा कार्यक्रम प्रेरणादायी आणि संस्मरणीय ठरला. या कार्यक्रमासाठी सर्व प्राचार्य, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांचे विशेष योगदान लाभले.

# गव्हाण विद्यालयात क्रांतिदिनानिमित्त भारतीय क्रांतिकारकांना अभिवादन

**उरण : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेज,गव्हाण-कोपर येथे शनिवार, दिनांक ८ ऑगस्ट २०२६ रोजी क्रांती दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजराकरण्यात आला. भारतमातेच्या स्वातंत्र्यासाठी आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या थोर स्वातंत्र्यसैनिक,क्रांतिकारक आणि देशभक्तांना यावेळी भावपूर्ण अभिवादन करण्यात आले.

विद्यालयाच्या प्राचार्या. ज्योत्स्ना ठाकूर, उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे, पर्यवेक्षिका शशिकला पाटील, रयत शिक्षण संस्थेचे लाईफ वर्कर व ज्येष्ठशिक्षक देवेंद्र म्हात्रे, रंजीता पाटील तसेच सर्व शिक्षकवृंद यांच्या शुभहस्ते भारतीय क्रांतिकारकांच्या प्रतिमांचे पूजन करून अभिवादन करण्यात आले.क्रांती दिनाच्या ऐतिहासिक स्मृती सदैवजागृत राहाव्यात, या उद्देशाने यावेळी क्रांतीज्योत प्रज्वलित करण्यात आली. धगधगती क्रांतीज्योत हुतात्म्यांच्या त्यागाची आणि बलिदानाची आठवण करून देत होती. स्वातंत्र्य मिळविण्यासाठी असंख्य ज्ञात-अज्ञात स्वातंत्र्यवीरांनी केलेल्या संघर्षाला विद्यार्थ्यांनी आपल्या उपक्रमातून मानवंदना दिली.



या कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरले ते म्हणजे विद्यार्थ्यांनी साकारलेल्या भारतीय स्वातंत्र्यसैनिक आणि देशभक्तांच्या भूमिका यामध्ये नकुल माने- भगतसिंग सानवी कडू -इंदिरा गांधी, नव्या पाटील - झाशीची राणी, प्रिन्स नाईक -महात्मा गांधी,अद्विक जाधव -पंडित नेहरू,सिद्धार्थ सावंत- बाबू गेनू,आरव धनावडे सुभाषचंद्र बोस, वैष्णव देशमुख- स्वातंत्र्यवीर सावरकर, जयवर्तक- सरदार पटेल आदी महान व्यक्तिमत्त्वांच्या भूमिका साकारून त्यांच्या कार्याची आणि देशभक्तीचीस्मृती जागवली.

यावेळी विद्यार्थ्यांनी आपल्या ओजस्वी भाषणांतून भारतीय स्वातंत्र्यलढ्याचा इतिहास,क्रांतिकारकांचे त्याग आणि देशाप्रती असलेली निष्ठा याविषयी मनोगते व्यक्त करून स्वातंत्र्यवीरांनाआदरांजली वाहिली.विद्यार्थी भाषणात जिग्नेश, वैष्णव, स्वरा,ममता,देवांती, नकुल,सिद्धार्थ,पूर्वी ,अश्विनी,प्रज्वल,अर्जुन, हंसिका,आर्या, रिया साक्षी, नव्या, जय,आरोही,आलिया याविद्यार्थ्यांनी भाषण केली. विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे संपूर्ण कार्यक्रमाला देशभक्तीची प्रेरणादायी किनार लाभली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सांस्कृतिक विभागप्रमुख हर्षला पाटील आणि विराज गोरडे यांनी प्रभावीपणे केले. "क्रांती दिनाचा विजय असो!", "हुतात्मा अमर रहे!", "भारत माता कीजय!", "वंदे मातरम्!" अशा देशभक्तीपर घोषणांनी विद्यालयाचा संपूर्ण परिसर दुमदुमून गेला.क्रांतिकारकांच्या त्यागाची आणि बलिदानाची प्रेरणा मनामनात रुजवत विद्यार्थ्यांनी देशप्रेम, राष्ट्रनिष्ठाआणि स्वातंत्र्याची जपणूक करण्याचा संदेश या क्रांती दिनाच्या माध्यमातून दिला. इयत्ता नववी 'ब' वर्गाने वर्गशिक्षिका रंजीता पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाचेउत्कृष्ट नियोजन केले होते.

# गणेशोत्सवापूर्वी माणगाव बायपासची एक लेन सुरु करण्यासाठी युद्धपातळीवर काम

## ◆ महामार्गावरील पेव्हर ब्लॉकवरून मंत्री आदिती तटकरे आक्रमक

**माणगाव : प्रतिनिधी**

गणेशोत्सवासाठी कोकणात जाणाऱ्या लाखो चाकरमान्यांसाठी यंदा मुंबईगोवा महामार्गावर काहीसा दिलासा मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे. गेल्या अनेक वर्षांपासून रखडलेल्या महामार्गाच्या कामांमुळे दरवर्षी वाहतूक कोंडी, अपघातांचा धोका आणि तासन्तासांचा प्रवासाचा मनस्ताप सहन करणाऱ्या कोकणवासीयांसाठी माणगाव–इंदापूर बायपासची किमान एक मार्गिका सुरू करण्यासाठी युद्धपातळीवर प्रयत्न सुरू आहेत. माणगाव –निजामपूर पुलापासून बायपासची एक लेन सुरू करण्याचे नियोजन असून, कळमजे नदीजवळ गर्डरचे काम पूर्ण झाल्यानंतर आवश्यक २१ दिवसांचा क्युरिंग कालावधी पूर्ण झाल्यावर



१५ सप्टेंबरनंतर कळमजे ते पुढील बायपास मार्ग वाहतुकीसाठी खुला होण्याची शक्यता खासदार सुनील तटकरे यांनी व्यक्त केली.

खा.सुनील तटकरे आणि महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांच्या उपस्थितीत दि. ८ ऑगस्ट रोजी माणगाव येथील शासकीय विश्रामगृहात राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांसमवेत राष्ट्रीय महामार्गावरील विविध प्रलंबित कामांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर कोकणात दाखल होणाऱ्या लाखो गणेशभक्तांचा प्रवास सुरक्षित, जलद आणि सुरळीत व्हावा, यासाठी महामार्गावरील कामे, वाहतूक नियोजन, अपघातप्रवण ठिकाणे, पर्यायी मार्ग तसेच रस्त्यांच्या दुरुस्तीबाबत महत्त्वपूर्ण निर्णय आणि सूचना देण्यात आल्या.

मुगवली बायपास परिसरातील बेरीकेडिंग आणि वाहतूक नियोजनाचाही बैठकीत गंभीरपणे विचार करण्यात आला. चुकीच्या पद्धतीने बेरीकेडिंग किंवा वाहतूक वळविल्यास अपघातांचा धोका वाढू शकतो. त्यामुळे वाहनांची सुरक्षित आणि शिस्तबद्ध वाहतूक होण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्याच्या सूचना देण्यात आल्या. गणेशोत्सवाच्या काळात साईराम हॉटेल, निजामपूर रोड ते मुगवली फाटा अशी पर्यायी मार्गिका सुरू करण्याचेही नियोजन आहे. मुख्य महामार्गावरील वाहतुकीचा ताण कमी करण्यासाठी या मार्गिकेचा प्रभावी वापर करण्यावर भर देण्यात येणार आहे.

ताम्हिणी घाटाचा प्रश्न गडकरींच्या दरबारात; १० किमी बोगद्याचा प्रस्ताव

पुणेदिघी बंदर मार्गासाठी ताम्हिणी घाट हा अत्यंत महत्त्वाचा दुवा आहे. घाटातील रस्ता बंद पडल्यास पुणे आणि कोकण यांच्यातील वाहतुकीवर मोठा परिणाम होतो. या पार्श्वभूमीवर केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या सोबत झालेल्या बैठकीत ताम्हिणी घाटातील वाहतुकीचा प्रश्न मांडण्यात आला. ताम्हिणी घाटातील दुरुस्तीची कामे युद्धपातळीवर पूर्ण करण्यात आली असून, घाटातील मार्ग आता वाहतुकीसाठी पूर्ववत सुरू करण्यात आला आहे.

मात्र भविष्यात वारंवार रस्ता बंद होण्याची समस्या उद्भवू नये आणि प्रवास अधिक वेगवान व सुरक्षित व्हावा, यासाठी ताम्हिणी घाट परिसरात सुमारे १० किलोमीटर लांबीचा बोगदा उभारण्याचा प्रस्ताव केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे मांडण्यात आला आहे. या बोगद्यामुळे रस्त्याची लांबी कमी होऊन प्रवाशांचा वेळ वाचेल तसेच घाटातील धोकादायक वळणे टाळता येतील.या प्रस्तावाचा DPR तातडीने तयार करून मंजुरीसाठी पाठविण्याच्या सूचना केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी दिल्या आहेत. त्यामुळे भविष्यात ताम्हिणी घाटाच्या वाहतूक व्यवस्थेला मोठे आणि कायमस्वरूपी बळ मिळण्याची शक्यता आहे.

महामार्गावरील टोलच्या प्रश्नावरही खा. सुनील तटकरे यांनी भूमिका स्पष्ट केली. सुकेळी येथील टोल नाका सध्या सुरू होणार नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. तसेच खारपाडा ते इंदापूर या मार्गाचे काम पूर्ण क्षमतेने झालेले नसताना टोल आकारण्यास विरोध करण्यात आला आहे. टोलच्या अंतरासंदर्भातही नाराजी व्यक्त करण्यात आली. केंद्र सरकारच्या नवीन टोल धोरणामुळे भविष्यात नागरिकांवरील टोलचा भार कमी होण्याची अपेक्षाही व्यक्त करण्यात आली.

---

## कोलाड उड्डाणपुलावरून ट्रेलर पलटी; संरक्षण कठड्यांचा अभाव, सुदैवाने जीवितहानी नाही



**कोलाड : रामप्रहर वृत्त**

मुंबई–गोवा राष्ट्रीय महामार्ग ६६ वरील कोलाड उड्डाण पुलाला संरक्षण कठडे नसल्याने कॉईल घेऊन जाणारा ट्रेलर पलटी झाला तर घडलेल्या या दुर्दैवी घटनेत सुदैवाने कोणतीही जिवीत हानी झाली नाही मात्र मोठा अनर्थ टळला.

याबाबत सविस्तर वृत्त असे कि रविवार दि.९ऑगस्ट रोजी पहाटे ५.०० वाजण्याच्या सुमारास मुंबई–गोवा महामार्गावरून नागोठणे बाजूकडून माणगाव बाजूकडे कॉईल भरून जाणारा ट्रेलर कोलाड येथील उड्डाण पुलावरून जात असतांना सुरवातीला उड्डाण पुलाला संरक्षण कठडे नसल्याने पुलाचा अंदाज न आल्यामुळे ट्रेलर पलटी झाला.तसेच ट्रेलरचा जॉईंट तुटल्यामुळे ट्रेलरची कॅबिन वर व ट्रेलर बायपास रस्त्यावर पलटी झाला असुन सुदैवाने कोणतेही जिवीत हानी झाली नाही.अधिक तपास कोलाड ठाण्याचे सपोनि भारत फार्णे यांच्या मार्गदर्शनाखाली कोलाड पोलीस करीत आहेत.

## नागोठण्यात आदिवासी संस्कृतीचा जागर; जागतिक आदिवासी दिन उत्साहात साजरा

**नागोठणे : बातमीदार**

आदिवासी बांधवांची समृद्ध संस्कृती, परंपरा, अस्तित्व आणि सामाजिक एकजूट कायमस्वरूपी जतन करण्याचा संदेश देत रोहा तालुका व नागोठणे विभाग (पेण) आदिवासी ठाकूर समाजाच्या वतीने रविवार, दि. ९ ऑगस्ट रोजी नागोठणे येथे जागतिक आदिवासी दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

नागोठणे ग्रामपंचायतीच्या श्री गणेश सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमास राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते किशोर जैन, सपोनि रविंद्र पारखे , गटविकास अधिकारी चिमाजी हंबीर, रोहा तालुका आदिवासी ठाकूर उन्नती



सामाजिक संस्था ता. अध्यक्ष गोविंद शिद, उपाध्यक्ष महेंद्र हंबीर, खजिनदार काशिनाथ शिद, सहखजिनदार धर्मेंद्र शिंद, सचिव कमलाकर बांगारा , सहसचिव लक्ष्मण सुतक, कार्याध्यक्ष मच्छिंद्र लेंडी, विभाग प्रमुख केशव शिद, सदस्य गणपत पारधी, मधुकर निरगुडे, बाबू शिद, तानाजी वारगुडे, विनोद निरगुडे, सुभाष हंबीर, पांडुरंग शिद, दिनेश कातकरी, लक्ष्मण सुतक, मधुकर पारधी, जानू हंबीर, होनाजी हंबीर जानू वारगुडे, किसन शिद, लक्ष्मण हंबीर, होनाजी हंबीर, मधुकर लेंडी, विश्वनाथ वारगुडे, आरती वाघमारे, लता हंबीर यांच्यासह आदिवासी ठाकूर समाजातील विविध पदाधिकारी, मान्यवर तसेच समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या कार्यक्रमाच्या निमित्ताने नागोठणे प्राथमिक आरोग्य केंद्र ते श्री गणेश सभागृहापर्यंत वाजत–गाजत भव्य मिरवणूक काढण्यात आली. पारंपरिक उत्साह आणि जल्लोषात निघालेल्या या मिरवणुकीत आदिवासी बांधव व भगिनींनी मोठ्या संख्येने सहभागी होत आपल्या समाजाच्या एकजुटीचे दर्शन घडविले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी प्रतिमा पूजन करण्यात आले. त्यानंतर आदिवासी ठाकूर उन्नती सामाजिक संस्थेच्या वतीने उपस्थित मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुण्यांनी उपस्थित आदिवासी बांधव व भगिनींना समाजाच्या प्रगतीसाठी शिक्षण, संघटन, सामाजिक बांधिलकी आणि आपल्या पारंपरिक संस्कृतीचे जतन याबाबत मार्गदर्शन केले.

## ९ ते १७ ऑगस्टदरम्यान प्रत्येक घरावर तिरंगा फडकविण्याचे नागोठणे सरपंचांचे आवाहन

**नागोठणे : बातमीदार**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव अंतर्गत रोहा तालुक्यातील नागोठणे ग्रामपंचायत यांच्या वतीने यंदाही 'हर घर तिरंगा' अभियान उत्साहात राबविण्यात येणार आहे. दि. ९ ऑगस्ट ते १७ ऑगस्ट या कालावधीत नागोठणे परिसरातील प्रत्येक नागरिकाने आपल्या घरावर अभिमानाने तिरंगा फडकवून देशभक्तीचा संदेश द्यावा, असे आवाहन नागोठणे ग्रामपंचायत सरपंच सुप्रिया संजय महाडिक यांनी केले आहे.

'माझा तिरंगा, माझा अभिमान, माझा देश, माझी कर्तव्य' या भावनेतून नागरिकांनी या अभियानात सक्रिय सहभाग नोंदवावा, असे ग्रामपंचायतीच्या वतीने सरपंच सुप्रिया महाडिक यांनी म्हटले आहे. तिरंगा हा केवळ राष्ट्रध्वज नसून तो देशाची एकता, अखंडता, स्वाभिमान आणि राष्ट्रप्रेमाचे प्रतीक आहे. त्यामुळे प्रत्येक नागोठणेकराने आपल्या घरावर तिरंगा फडकवून या राष्ट्राभिमानाच्या उपक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

'आपल्या घरावर तिरंगा फडकवा, देशभक्तीची परंपरा जपा, एकता–अखंडता आणि अभिमान वाढवा', असा संदेश या अभियानाच्या माध्यमातून देण्यात आला आहे.स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाच्या पार्श्वभूमीवर नागोठणे ग्रामपंचायतीने राबविलेल्या या उपक्रमामुळे गावात देशभक्तीचे वातावरण निर्माण होण्यास मदत होणार असून, नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन सरपंच सुप्रिया महाडिक यांनी केले आहे.

---

## माध्यमिक विद्यामंदिर रातवड विद्यालयाचे विद्यार्थी वनविहार व वर्षासहलीत रंगले!

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगांव –निसर्ग हा गुरू आहे.पावसाळ्यातील दिवसात हा निसर्ग अगदी भरभरून ज्ञान देत असतो .विद्यार्थ्यांना निसर्गाचा सहवास लाभावा ,निसर्गाची ओळख व्हावी या उद्देशाने छत्रपती शिक्षण मंडळ कल्याण संचलित माध्यमिक विद्यामंदिर रातवड विद्यालयात वनविहार व वर्षासहलीचे आयोजन शुक्रवार दि.७ ऑगस्ट रोजी निळज गाव परिसरात करण्यात आले होते.

विद्यालयाच्या पंचक्रोशीतील निळज गावातील माळरानावर सकाळी ८ ते दुपारी २ वाजेपर्यंत विध्यार्थ्यांणी मनमुराद



निसर्गाचा आनंद घेतला.निळज गावचे ग्रामदैवत श्री भैरवनाथ मंदिरात व माळरानावरील संतोषी माता मंदिरात आरती करून वनविहारास सुरुवात झाली. शिक्षकांसह विद्यार्थ्यांनी नवीन होणाऱ्या एमआयडीसी परिसर,धरण परिसर ,ओहोळ व विविध झुडपांचे निरीक्षण केले.विविध पानांचे आकार, रंग तसेच पावसाळ्यात उगवणारी फुले यांचे निरीक्षण केले.काही विध्यार्थ्यांनी या फुलांपासून सुंदर पुष्पगुच्छ बनविले.पावसाच्या सरी व वाहणाऱ्या ओहोळामधून मनसोक्त हिंडत विद्यार्थ्यांनी वनविहाराचा तसेच माळरानावर मनसोक्त खोखो, कबड्डी, फुटबॉल खेळाचा आनंद घेतला.

निळज गावातील ग्रामस्थानी सर्व विद्यार्थ्यांसाठी सुग्रास अशा भोजनाची व्यवस्था केली होती.माळरानावर भोजनानंतर ग्रामस्थ परिचय संवाद घडून आला.मुख्याध्यापक संतोष कदम यांनी निसर्ग का पहायचे हे सांगून विध्यार्थ्यांना निसर्गाची आवड निर्माण व्हावी यासाठी हा उपक्रम असल्याचे सांगितले .शिक्षक भिवा पवार यांनी वर्षा सहलीचे सुंदर असे नियोजन केले.सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी , शाळेतील समित्यांचे पदाधिकारी ,निळज ग्रामस्थ यांनी सहकार्य केले.

## खालापूर तालुक्यात आदिवासी दिन साजरा

**चौक : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील आदिवासी बांधवांनी आज आंतरराष्ट्रीय आदिवासी दिन रॅली, पारंपरिक कला नृत्य सादर करून आणि शहीद आदिवासी नेते यांना आदरांजली अर्पण करून साजरा केला.

मुंबई पुणे रस्त्यावरील काळंबा मंदिराच्या आवारात शहीद मान्यवर यांच्या प्रतिमेस भाजप उत्तर रायगड उपाध्यक्ष सुधीर ठोंबरे,जिल्हा परिषद सदस्य वैशाली खैर, माजी जिल्हा परिषद सदस्य मोतीराम ठोंबरे, प्रफुल्ल विचारे, अध्यक्ष मंगळ पोकळा, अंकुश वाघ यांनी पुष्पहार अर्पण करून रॅलीला सुरुवात झाली.ही रॅली चौक बाजारपेठ मधून कलोते येथील शिवस्मारकाला अभिवादन केले यावेळी सुप्रसिद्ध अभिनेत्री पूजा भट यांनी रॅलीचे स्वागत केले.खोपोली, खालापूर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून आदिवासी भुवन येथे उभारण्यात आलेल्या भव्य मंडपात आल्यावर पारंपरिक नृत्य, कला सादर करण्यात आली.रॅलीत वेगवेगळ्या वेशभूषा



करण्यात आल्या होत्या.आदिवासी दिनाचा जयघोष करण्यात आला.

दरवर्षी ९ ऑगस्ट हा दिवस जागतिक आदिवासी दिन म्हणून साजरा केला जातो. आदिवासी समाजाचे हक्क, त्यांची संस्कृती आणि त्यांचे अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी पाळला जाणारा महत्त्वाचा दिवस आहे,जमीन,भाषा आणि मानवी हक्कांचे रक्षण करण्यासाठी या दिवसाला अतिशय महत्व आहे, असे ज्येष्ठ समाजसेवक आणि उद्योगपती प्रीतम म्हात्रे यांनी सांगितले.आदिवासी समाजाच्या पारंपरिक कला,भाषा, आणि जीवनशैलीचा सन्मान करणे. जल,जंगल आणि जमीन वाचवण्यासाठी आदिवासींनी दिलेल्या योगदानाची दखल आजच्या जागतिक आदिवासी दिवसांनी घेतली असल्याचे प्रतिपादन सभापती कृष्णा पारंगे यांनी केले.

या कार्यक्रमाला पनवेल महानगर पालिका सभापती ममता प्रीतम म्हात्रे उपस्थित होत्या. ममता म्हात्रे यांनी डबा ढोलकी या नाचगाण्याची प्रशंसा केली.यावेळी विविध क्षेत्रात काम केलेल्या मान्यवरांचा सन्मान करण्यात आला. अध्यक्ष मंगळ पोकळा, उपाध्यक्ष महेश पवार, सचिव दिलीप डाके, सह सचिव विष्णू वाघमारे, महिला अध्यक्ष हिरा पवार, खजिनदार वामन पिरकट, सहखजिनदार संजय पवार, पंचायत समिती सदस्य सौ कमल भस्मा, यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रयत्न केले.

---

## मुरूड तालुका माध्यमिक शिक्षकेतर संघटनेच्या अध्यक्षपदी राहुल वर्तक

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरुड तालुका माध्यमिक शिक्षकेत्तर संघटनेची वार्षिक सर्वसाधारण सभा सर एस ए हायस्कूल येथील प्रशस्त हॉल मध्ये झाली.या सभेत नवीन कार्यकारणी निवडण्यात आली. मुरुड तालुका माध्यमिक शिक्षकेत्तर संघटनेच्या अध्यक्ष पदी राहुल वर्तक,उपाध्यक्ष पदी नांदगाव हायस्कूल चे वरिष्ठ लिपिक मंगेश नांदगावकर यांची निवड करण्यात आली. यावेळी माध्यमिक शिक्षक संघटनेचे



जिल्हा उपाध्यक्ष सतीश पेडणेकर, प्रदीप काळोखे, संतोष पाटील, नारायण पाटील, मिलिंद मोहिते, संतोष बुल्लू, उल्हास गुंजाळ, अल्बर्ट मार्टीस आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी पुढील तीन वर्षासाठी नवीन कार्यकारणी गठित करण्यात आली.यावेळी उपस्थित मान्यवर यांच्या अनुमतीने मुरुड तालुका माध्यमिक शिक्षकेत्तर संघटनेच्या अध्यक्षपदी राहुल वर्तक,उपाध्यक्ष पदी नांदगाव हायस्कूल चे वरिष्ठ लिपिक मंगेश नांदगावकर, सचिव म्हणून रियान कादरी तर सदस्य म्हणून संगीता मुणेकर व वंदेश तेलंगे यांची निवड जाहीर करण्यात आली.

## निशिगंधा चॅरिटेबल ट्रस्टच्या गृहिणींना कॅनरा बँकेच्या 'सीएसआर'चा हातभार

**नागोठणे : बातमीदार**

निशिगंधा चॅरिटेबल ट्रस्टच्या माध्यमातून महिलांना स्वावलंबी बनविण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांना आता कॅनरा बँकेच्या सीएसआर विभागाकडून आर्थिक पाठबळ मिळणार आहे. ट्रस्टच्या गृहिणींना स्मॉल स्केल उद्योग सुरू करण्यासाठी ४० हजार रुपयांचा निधी देण्यात येईल, असे कॅनरा बँक मुंबईच्या सीएसआर विभागाचे जनरल मॅनेजर आनंदराव पालवे यांनी ठोस आश्वासन दिले.

भाजप पेण शहर उपाध्यक्षा



तथा निशिगंधा चॅरिटेबल ट्रस्टच्या चेअरमन निशिगंधा गुंड आणि भाजप शिक्षण सेल रोहा तालुका अध्यक्ष अशोक अहिरे यांनी मुंबई येथे कॅनरा बँक, मुंबईच्या सीएसआर विभागाचे जनरल मॅनेजर आनंदराव पालवे यांची भेट घेतली. यावेळी सामाजिक, महिला सक्षमीकरण तसेच शिक्षण क्षेत्रातील विविध उपक्रमांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.यावेळी कॅनरा बँकेच्या सीएसआर विभागामार्फत शिक्षण क्षेत्रासाठी निधी उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचे आनंदराव पालवे यांनी अशोक अहिरे यांना सांगितले. त्यावर अशोक अहिरे यांनी भाजप शिक्षण सेलच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या विविध शैक्षणिक उपक्रमांची माहिती देत मार्गदर्शन केले.

विद्यार्थ्यांना शालेय गणवेश, वह्या–पुस्तके उपलब्ध करून देणे, विविध स्पर्धात्मक परीक्षांसाठी मार्गदर्शन शिबिरे आयोजित करणे, तसेच आदिवासी भागातील गरजू विद्यार्थ्यांना दत्तक घेऊन त्यांच्या शैक्षणिक खर्चाची जबाबदारी घेणे, अशा विविध उपक्रमांची माहिती अशोक अहिरे यांनी यावेळी दिली. शिक्षण क्षेत्रात काम करण्यासाठी कॅनरा बँकेच्या सीएसआर विभागाने सहकार्याची भूमिका घेतल्याबद्दल अशोक अहिरे यांनी कॅनरा बँक व आनंदराव पालवे यांचे आभार मानले. या माध्यमातून गरजू विद्यार्थी, महिला व समाजातील विविध घटकांना भविष्यात मोठ्या प्रमाणात मदत मिळण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

# वर्ल्ड अंडर-२० ॲथलेटिक्समध्ये भारताचा डंका

## आशिष यादवला रौप्य, शाहनवाज खानने जिंकले कांस्य







**यूजीन : वृत्तसंस्था**

अमेरिकेतील यूजीन येथे सुरू असलेल्या वर्ल्ड ॲथलेटिक्स यू२० चॅम्पियनशिपमध्ये भारताच्या युवा खेळाडूंनी चांगली कामगिरी करत स्पर्धेच्या तिसऱ्या दिवशी भारताचं पदकांचं खातं उघडलं. आशिष यादवने भालाफेकीत रौप्यपदक जिंकलं, तर त्यानंतर शाहनवाज खानने लांब उडीत कांस्यपदक पटकावत भारताच्या पदकांमध्ये आणखी एका पदकाची भर घातली.

पुरुषांच्या भालाफेक स्पर्धेत १९ वर्षीय आशिष यादवने ७४.०९ मीटरची भालाफेक करत दुसरं स्थान मिळवलं. त्याने ही सर्वोत्तम कामगिरी तिसऱ्या प्रयत्नात केली. या कामगिरीसह आशिषने एक खास विक्रम आपल्या नावावर केला. वर्ल्ड ॲथलेटिक्स यू२० चॅम्पियनशिपमध्ये भालाफेकीत रौप्यपदक जिंकणारा तो नीरज चोप्रानंतरचा दुसरा भारतीय ठरला.

नीरजने २०१६मध्ये पोलंड येथे झालेल्या यू२० चॅम्पियनशिपमध्ये सुवर्णपदक जिंकलं होतं. त्यावेळी त्याने ८६.४८ मीटरची भालाफेक करत वर्ल्ड ज्युनियर रेकॉर्ड केला होता. हा विक्रम आजही कायम आहे. आशिषला सुवर्णपदक दक्षिण आफ्रिकेच्या जान-हेन्ड्रिक हेयमन्सने मिळवलं. त्याने अंतिम प्रयत्नात ८०.५० मीटर भालाफेक केली. ही त्याची या हंगामातील यू२० गटातील सर्वोत्तम जागतिक कामगिरी ठरली.

यानंतर भारताच्या १८ वर्षीय शाहनवाज खानने पुरुषांच्या लांब उडीच्या अंतिम फेरीत कांस्यपदक जिंकलं. शाहनवाजने आपल्या तिसऱ्या प्रयत्नात ७.८४ मीटरची उडी मारली. हीच त्याची स्पर्धेतील सर्वोत्तम कामगिरी ठरली. त्याच्या सहा प्रयत्नांची मालिका ७.६७, ७.७२, ७.८४, ७.५२, ७.८३ आणि ५.३७ मीटर अशी राहिली. विशेष म्हणजे पाचव्या प्रयत्नातही त्याने ७.८३ मीटरची उडी मारली. त्यामुळे पदकाच्या शर्यतीत तो शेवटपर्यंत टिकून राहिला.

लांब उडीत इटलीच्या डॅनिएले इन्झोलीने ७.९७ मीटरची उडी मारत सुवर्णपदक जिंकलं. ऑस्ट्रेलियाच्या मेसन मॅकग्रोडरने ७.९६ मीटरची वैयक्तिक सर्वोत्तम कामगिरी करत रौप्यपदक पटकावलं. शाहनवाजला कांस्यपदक मिळालं. या अंतिम फेरीत भारताचा आणखी एक खेळाडू आरसी जितिन अर्जुनन होता. त्याची सर्वोत्तम उडी ७.५९ मीटर राहिली आणि तो आठव्या क्रमांकावर राहिला.

शाहनवाजच्या कांस्यपदकाआधी भारताला बासंत कुमार मेघवालने उंच उडीत रौप्यपदक मिळवून दिलं होतं. बासंतने २.२१ मीटरची वैयक्तिक सर्वोत्तम उडी मारली होती. त्यामुळे वर्ल्ड यू२० चॅम्पियनशिपमध्ये भारताच्या खात्यात आता दोन रौप्य आणि एक कांस्य अशी तीन पदके जमा झाली आहेत.

आशिष यादव, बासंत मेघवाल आणि शाहनवाज खान या तिन्ही युवा खेळाडूंनी आपल्या कामगिरीने भारताचे नाव उंचावले आहे.

# अशिमता चालिहाने जिंकले पहिले बीडब्ल्यूएफ वर्ल्ड टूर विजेतेपद




**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय बॅडमिंटनपटू अशिमता चालिहाने कोरिया मास्टर्स २०२६मध्ये मोठी कामगिरी केली आहे. आसामच्या २६ वर्षीय अशिमताने महिला एकेरीच्या अंतिम सामन्यात चीनच्या चौथ्या मानांकित हान कियान शीचा पराभव करत आपल्या कारकिर्दीतील पहिले BWF वर्ल्ड टूर विजेतेपद पटकावले.

रविवारी दक्षिण कोरियातील आसन येथे झालेल्या अंतिम सामन्यात अशिमताची सुरुवात मात्र चांगली झाली नाही. तिला पहिलाच गेम १४-२१ असा गमवावा लागला. पण त्यानंतर अशिमताने जबरदस्त कमबॅक केलं. पुढचे दोन्ही गेम तिने २१-१४, २१-१४ असे जिंकत सामना आपल्या नावावर केला. तब्बल ५३ मिनिटे चाललेल्या या सामन्यात अशिमताने दबावाच्या परिस्थितीतही संयम सोडला नाही. सामन्याच्या सुरुवातीला चीनच्या हान कियान शीने अशिमतावर चांगलाच दबाव टाकला. तिच्या आक्रमक खेळामुळे अशिमताला पहिला गेम १४-२१ असा गमवावा लागला.

दुसऱ्या गेममध्ये अशिमताने आपल्या खेळात बदल केला. रॅलीमध्ये संयम ठेवत तिने हानला सहज गुण मिळू दिले नाहीत. याचा फायदा तिला मिळाला आणि तिने दुसरा गेम २१-१४ असा जिंकत सामना १-१ असा बरोबरीत आणला. तिसऱ्या आणि निर्णायक गेममध्येही अशिमताने आपली लय कायम ठेवली. तिने पुन्हा २१-१४ असा गेम जिंकला आणि सामना जिंकत ट्रॉफीवर कब्जा केला.

अशिमताचा विजेतेपदापर्यंतचा प्रवास अजिबात सोपा नव्हता. क्वार्टर फायनलमध्ये तिच्यासमोर जपानची टॉप सीड आणि जागतिक क्रमवारीतील २२व्या क्रमांकाची हिना अकेची होती. या सामन्यातही अशिमताला पहिला गेम गमवावा लागला. मात्र, त्यानंतर तिने जोरदार पुनरागमन करत सामना २०-२२, २१-१५, २१-१९ असा जिंकला. या विजयासह तिने स्पर्धेत मोठा उलटफेर केला आणि थेट उपांत्य फेरीत प्रवेश केला.

उपांत्य फेरीत अशिमतासमोर भारताचीच रक्षिता रामराज होती. त्यामुळे हा सामना दोन भारतीय खेळाडूंमधील चांगलाच रंगला. तीन गेमपर्यंत चाललेल्या या सामन्यात अशिमताने २१-१३, १६-२१, २१-१३ असा विजय मिळवला आणि अंतिम फेरीचं तिकीट पक्कं केलं. विशेष म्हणजे क्वार्टर फायनल आणि फायनल या दोन्ही सामन्यांमध्ये अशिमताने पहिला गेम गमावला. पण दोन्ही वेळा तिने परिस्थिती बदलत सामना जिंकला. अशिमतासाठी हे विजेतेपद आणखी खास आहे. कारण काही महिन्यांपूर्वी ती दुखापतीमुळे बॅडमिंटन कोर्टपासून दूर होती.उजव्या गुडघ्यात टियर झाल्यामुळे तिला जवळपास तीन महिने खेळापासून दूर राहावं लागलं होतं. मे महिन्यात तिने पुन्हा कोर्टवर पुनरागमन केलं.

कोरिया मास्टर्सच्या संपूर्ण स्पर्धेत अशिमताने एक गोष्ट वारंवार दाखवून दिली सामना हातातून जात असला तरी हार मानायची नाही. क्वार्टर फायनलमध्ये पहिला गेम गमावला, फायनलमध्येही पहिला गेम गमावला; पण दोन्ही सामन्यांत तिने जबरदस्त कमबॅक केले. चीनच्या चौथ्या मानांकित खेळाडूला पराभूत करत अशिमताने आपल्या कारकिर्दीतील पहिले बीडब्ल्यूएफ वर्ल्ड टूर विजेतेपद मिळवले.

# अक्षय लिलकेने पटकावले कांस्यपदक

**क्युटो : वृत्तसंस्था**

### आशियाई मॅरेथॉन स्पर्धा

जपानमधील क्युटो शहरात सुरू असलेल्या सहाव्या आशियाई कॅनोइंग अँड कयाकिंग मॅरेथॉन चॅम्पियनशिप स्पर्धेत भारतीय संघाकडून प्रतिनिधित्व करताना नाशिकच्या मराठा विद्या प्रसारक समाज (मविप्र) संस्थेतील अक्षय लिलके या खेळाडूने कॅनोइंग या क्रीडा प्रकारात कांस्यपदक पटकावत जपानमध्ये भारताचा तिरंगा फडकावला आहे.

चार दिवसांपूर्वी आशियाई कॅनोइंग अँड कयाकिंग मॅरेथॉन स्पर्धेसाठी जपानला रवाना झालेल्या भारतीय संघामध्ये अक्षय लिलकेचा समावेश झाला आहे. या संघासोबत प्रशिक्षक म्हणून नाशिकच्या केटीएचएम महाविद्यालयातील क्रीडा संचालक



प्रा. हेमंत पाटील हेदेखील सहभागी झाले आहेत. क्युटो शहरातील कुमी हामा बे कॅनो स्टेडियमवर गुरुवारी झालेल्या कॅनोइंग स्पर्धेत तीन किलोमीटर रेसमध्ये भारताच्या अक्षय शांताराम लिलकेने २२ मिनिटे ४५ सेकंद आणि ९३ मायक्रो सेकंद वेळ नोंदवत कांस्यपदक पटकावले.

# महिला टी-२० आशिया कपचा रंगणार थरार

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आशियाई क्रिकेट परिषदेने महिला टी-२० आशिया चषक स्पर्धेचे अधिकृत वेळापत्रक जाहीर केले आहे. आठ संघांचा सहभाग असलेली ही मालिका २८ ऑगस्ट ते १३ सप्टेंबरदरम्यान दुबई येथे पार पडणार आहे. २८ ऑगस्ट रोजी गट 'अ' मधील हाँगकाँग विरुद्ध थायलंड सामन्याने स्पर्धेचा नारळ फुटेल.

जगभरातील क्रिकेट चाहत्यांचे लक्ष लागलेला भारत आणि पाकिस्तान यांच्यातील महामुकाबला ५ सप्टेंबर रोजी रंगणार आहे. या स्पर्धेचा अंतिम सामना १३ सप्टेंबर रोजी खेळवला जाईल. सर्व सामने दुबई इंटरनॅशनल क्रिकेट स्टेडियमवर पार पडतील.

# गंभीरचे प्रशिक्षकपद धोक्यात?



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

टीम इंडियाचे प्रशिक्षक म्हणून गौतम गंभीर यांनी जबाबदारी स्वीकारल्यापासून कसोटी क्रिकेटमधील संघाची कामगिरी चांगली राहिलेली नाही. भारताला घरच्या मैदानावर न्यूझीलंड आणि दक्षिण आफ्रिकेकडून पराभवाचा सामना करावा लागला आहे. तसेच ऑस्ट्रेलियानेही भारताचा धुव्वा उडवला. केवळ इंग्लंडविरुद्धची मालिका भारताने अनिर्णित राखली आहे. या खराब कामगिरीमुळे टीम इंडियाचे मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर कमालीच्या दबावाखाली आहेत. जर श्रीलंकाविरुद्धच्या मालिकेतही भारताचा पराभव झाला तर गंभीर यांना कसोटी फॉरमॅटमधील मुख्य प्रशिक्षकाच्या पदावरून हटवले जाऊ शकते.

रिपोर्ट्सनुसार जर श्रीलंकेविरुद्धच्या कसोटी मालिकेतही संघाला पराभवाचा सामना करावा लागला, तर त्यांना या फॉरमॅटमधून बाहेर केले जाऊ शकते आणि त्यांच्या जागी व्ही.व्ही.एस. लक्ष्मण यांच्याकडे ही जबाबदारी सोपवली जाऊ शकते. नुकताच इंग्लंड क्रिकेट बोर्डानेही असाच एक निर्णय घेतला आहे. त्यांनी वनडे आणि टी-२० साठी ब्रेंडन मॅक्युलम यांना प्रशिक्षक बनवले, तर कसोटी फॉरमॅटची जबाबदारी स्टीफन फ्लेमिंग यांच्याकडे सोपवली आहे.

दरम्यान, आता असाच फॉर्म्युला टीम इंडियामध्येही पाहायला मिळू शकतो.

# सचिन बेस्ट बॅटर, पण कॅलिस बेस्ट क्रिकेटर -ब्रेट ली

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारताचा दिग्गज क्रिकेटपटू सचिन तेंडुलकर याला या खेळाच्या इतिहासातील सर्वोत्तम खेळाडूंपैकी एक मानले जाते. मात्र, ऑस्ट्रेलियाचा माजी वेगवान गोलंदाज ब्रेट ली याचे मत यापेक्षा थोडे वेगळे आहे. सचिन तेंडुलकरऐवजी ली यांनी दक्षिण आफ्रिकेचा दिग्गज अष्टपैलू खेळाडू जॅक कॅलिस याची 'सर्वकाळातील सर्वोत्तम क्रिकेटपटू' म्हणजेच GOAT म्हणून निवड केली आहे. असे असले तरी त्यांनी सचिनला आपण पाहिलेला 'सर्वोत्तम फलंदाज' असल्याचे मान्य केले आहे.



आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये तब्बल १०० शतके ठोकण्याचा विक्रम सचिन तेंडुलकरच्या नावावर आहे; ही कामगिरी करणारा तो जगातील एकमेव फलंदाज आहे. दुसरीकडे, जॅक कॅलिसने फलंदाजी, गोलंदाजी आणि क्षेत्ररक्षण अशा तिन्ही क्षेत्रांत उत्कृष्ट कामगिरी केली आहे.बीअरबायसेप्स पॉडकास्टवरील चर्चेदरम्यान ब्रेट ली यांनी सांगितले की, त्यांच्या मते सचिन हा सर्वकाळातील सर्वोत्तम फलंदाज आहे. मात्र, जेव्हा 'सर्वांगीण परिपूर्ण क्रिकेटपटू' निवडण्याची वेळ येते, तेव्हा कॅलिस हा सचिनपेक्षा सरस ठरतो असे त्यांना वाटते.

ली म्हणाले, "जरी मी सचिन तेंडुलकरला नेहमीच आपण पाहिलेला सर्वोत्तम फलंदाज मानले असले, तरी एकूणच सर्वोत्तम क्रिकेटपटू म्हणून माझी पसंती जॅक कॅलिसला आहे." ली यांनी पुढे सांगितले की कॅलिसची आकडेवारी जगातील सर्वोत्तम आहे आणि "आकडे कधीच खोटे बोलत नाहीत".दक्षिण आफ्रिकेचा दिग्गज खेळाडू जॅक कॅलिस हा जगातील एकमेव असा क्रिकेटपटू आहे, ज्याने कसोटी आणि एकदिवसीय अशा दोन्ही प्रकारच्या क्रिकेटमध्ये १०,०० हून अधिक धावा आणि २५० हून अधिक विकेट्स घेतल्या आहेत.

जॅक कॅलिससोबतचा ब्रेट ली यांचा वैयक्तिक अनुभवही त्यांच्या या निवडीमागील एक कारण आहे. २०१ ते २०१३ या काळात हे दोघेही कोलकाता नाईट रायडर्सच्या ड्रेसिंग रूममध्ये एकत्र होते. कॅलिसने २०११ ते २०१४ या काळात केकेआरसाठी ५६ सामने खेळले, तर ब्रेट ली २०११ ते २०१३ या कालावधीत संघाचा भाग होता.

# ऋतुराजचा वर्ल्ड रेकॉर्ड तुटला!

## इंग्लंडचा जेक लिबी बनला नंबर १




**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

वॉर्सेस्टरशायरचा कर्णधार जेक लिबी याने 'लिस्ट-ए' क्रिकेटमधील सर्वाधिक फलंदाजी सरासरीचा भारताच्या ऋतुराज गायकवाडचा जागतिक विक्रम मोडला आहे. या यादीत आता गायकवाड दुसऱ्या स्थानावर घसरला आहे. ससेक्सविरुद्ध नाबाद १०९ धावांची खेळी करत लिबीने अव्वल स्थान पटकावले. या फॉर्मेटमधील त्याचे हे सलग तिसरे शतक ठरले. या शतकानंतर लिबीची फलंदाजी सरासरी ६१.४० झाली आहे, तर ऋतुराज गायकवाडची सरासरी ५८.६१ इतकी आहे.

या अव्वल पाच फलंदाजांच्या यादीत टीम इंडियाचा स्टार फलंदाज विराट कोहली याचाही समावेश आहे. लिबीने आतापर्यंत ५६ 'लिस्ट-ए' सामने खेळले असून, त्यात ६१.४० च्या सरासरीने २४५६ धावा केल्या आहेत. त्याच्या नावावर सहा शतके आणि १८ अर्धशतके आहेत.सध्या सुरू असलेल्या 'वन-डे कप'मध्ये सलग तिसरे शतक झळकावून लिबीने ऋतुराज गायकवाडला मागे टाकले आणि 'लिस्ट-ए' क्रिकेटमध्ये सर्वाधिक फलंदाजी सरासरीचा विक्रम आपल्या नावे केला.

लिबीने ससेक्सविरुद्ध सामना जिंकून देणारी खेळी केली. त्याने ९६ चेंडूत नाबाद १०९ धावा केल्या, ज्यामुळे वॉर्सेस्टरशायरला ३३४ धावांचे आव्हानात्मक लक्ष्य यशस्वीपणे गाठता आले. लिबीच्या सध्याच्या फॉर्मची एक उल्लेखनीय बाब म्हणजे या स्पर्धेत त्याने सलग तीन डावांमध्ये प्रत्येकी नेमक्या १०९ धावा केल्या आहेत. याची सुरुवात मिडलसेक्सविरुद्धच्या नाबाद १०९ धावांच्या खेळीने झाली. या खेळीमुळे वॉर्सेस्टरशायरला २९४ धावांचे लक्ष्य गाठता आले होते. त्यानंतर त्याने एसेक्सविरुद्ध पुन्हा एकदा १०९ धावांची खेळी केली, मात्र त्या सामन्यात त्याच्या संघाला ३७ धावांचे लक्ष्य गाठता आले नाही.

'लिस्ट-ए' क्रिकेटमध्ये सर्वाधिक सरासरी असलेल्या अव्वल पाच फलंदाजांच्या यादीत विराट कोहली पाचव्या स्थानावर आहे. त्याने ३५० सामन्यांत ५७.८० च्या सरासरीने १६,५९१ धावा केल्या आहेत. या प्रकारात आतापर्यंत सर्वाधिक शतके झळकावण्याचा विक्रम त्याच्या नावावर आहे.

# २०२७च्या वर्ल्डकपसाठी नऊ संघ निश्चित

## अफगाणिस्तानचे स्थान पक्के

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आयर्लंडविरुद्धच्या दुसऱ्या एकदिवसीय सामन्यात ९२ धावांनी दणदणीत विजय मिळवून अफगाणिस्तानने २०२७च्या एकदिवसीय विश्वचषकासाठी थेट पात्रता निश्चित केली आहे. आयर्लंडमध्ये सुरू असलेल्या पाच सामन्यांच्या मालिकेतील पहिला सामना पावसामुळे रद्द झाला होता. मात्र, दुसऱ्या सामन्यात फलंदाजी आणि गोलंदाजीमध्ये दमदार कामगिरी करत अफगाणिस्तानने विश्वचषकातील आपले स्थान पक्के केले.




प्रथम फलंदाजी करताना अफगाणिस्तानने आयर्लंडसमोर ३०० धावांचे लक्ष्य ठेवले. त्यानंतर, त्यांच्या गोलंदाजांनी उत्कृष्ट कामगिरी करत आयर्लंडचा डाव २०७ धावांत गुंडाळला. अफगाणिस्तानचा स्टार फिरकीपटू राशिद खानने ३४ धावांत ६ बळी टिपले. त्याने संघाचा विजय निश्चित करण्यात मोलाची भूमिका बजावली. या विजयासह २०२७च्या एकदिवसीय विश्वचषकासाठी थेट पात्रता मिळवणारा अफगाणिस्तान हा नववा संघ ठरला आहे. यजमान म्हणून दक्षिण आफ्रिका, नामिबिया आणि झिम्बाब्वे यांनी आधीच थेट पात्रता मिळवली आहे. याव्यतिरिक्त भारत, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड, इंग्लंड, पाकिस्तान आणि श्रीलंका यांनीही आपली स्थाने निश्चित केली आहेत.

विश्वचषकासाठी थेट पात्रतेचे आता केवळ एकच स्थान शिल्लक आहे. या स्थानासाठी बांगलादेश आणि वेस्ट इंडीज हे मुख्य दावेदार आहेत. सध्या बांगलादेश क्रमवारीत नवव्या स्थानावर असून ते मजबूत स्थितीत आहेत. जर सप्टेंबरमध्ये नियोजित भारत-बांगलादेश यांच्यातील एकदिवसीय मालिका झाली नाही तर बांगलादेशला विश्वचषकात थेट प्रवेश मिळण्याची शक्यता आहे. अशा परिस्थितीत वेस्ट इंडिजला पात्रता स्पर्धेत खेळावे लागू शकते.

# आयपीएल २०२७मध्ये ऑस्ट्रेलियन खेळाडूंचा पत्ता कट?

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

इंडियन प्रीमियर लीगचा पुढील सीझन म्हणजेच आयपीएल २०२७ पुढील वर्षी खेळवला जाणार आहे. सध्या आयपीएलच्या पुढील सीझनचे वेळापत्रक जाहीर झालेले नाही, परंतु जगातील ही सर्वात मोठी लीग मार्च ते मेदरम्यानच खेळवली जाईल. ऑस्ट्रेलियन क्रिकेट संघाला ऑगस्ट २०२६ ते ऑगस्ट २०२७ दरम्यान प्रचंड क्रिकेट खेळायचे आहे. पुढील एका वर्षात ऑस्ट्रेलियन संघाला २० कसोटी आणि १४ मर्यादित षटकांचे सामने खेळायचे आहेत. अशा परिस्थितीत ऑस्ट्रेलियन खेळाडू आयपीएल २०२७ मधून माघार घेऊ शकतात. याचे संकेत संघाच्या मुख्य प्रशिक्षकांनी दिले आहेत.

ऑस्ट्रेलियाचे मुख्य प्रशिक्षक अँड्र्यू मॅकडोनाल्ड यांनी संकेत दिले आहेत की, ऑस्ट्रेलियाच्या प्रमुख कसोटी क्रिकेटपटूंना पुढील वर्षी होणाऱ्या आयपीएलमधील आपल्या सहभागाबाबत कठीण निर्णय घ्यावे लागू शकतात, कारण संघ त्यांच्या आंतरराष्ट्रीय कॅलेंडरमधील सर्वात व्यस्त टप्प्यांपैकी एकासाठी तयारी करेल. ऑस्ट्रेलियाला पुढील १२ महिन्यांत २० कसोटी आणि १४ व्हाईट-बॉल आंतरराष्ट्रीय सामने खेळायचे आहेत. यामध्ये भारतात होणाऱ्या पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेचाही समावेश आहे. कसोटी क्रिकेटच्या १५० व्या वर्धापन दिनानिमित्त इंग्लंडविरुद्ध ऑस्ट्रेलिया एक कसोटी सामना खेळणार आहे, तर कांगारूंची एशेज मालिकेतही इंग्लिश संघाशी गाठ पडणार आहे.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com